# अशी माणसें

शं.रा.देवळे



02802

[illegible]
[illegible]
[illegible] ...२८०२ [illegible] ......
[illegible] ..ग्री.था. [illegible]..........

२८०३
९/८/८३

# असा इतिहास, अशी माणसे

शं. रा. देवळे

BVBK-0402802

पृथ्वी प्रकाशन
पुणे ५१

**प्रकाशिका :**
सौ. स्मिता इनामदार

---

**पृथ्वी प्रकाशन**
'त्रिवेणी संगम', माणिकबाग,
सिंहगड रस्ता,
पुणे ४११ ०५१

---

**टाइपसेटिंग :**
पॅन टायपोग्राफिक्स

---

**मुद्रक :**
ॲक्वा ग्राफिक्स

---

**© शं. रा. देवळे**
पुणे ३०

---

**ऑगस्ट १९९१**

---

**किंमत - रु.२०/-**

# अनुक्रमणिका


महावीर ५
गौतम बुद्ध ७
आर्य चाणक्य ८
चंद्रगुप्त मौर्य १०
अशोक १२
समुद्रगुप्त १४
हर्ष १६
दुसरा पुलेकेशी १८
श्री शंकराचार्य २०
रझिया २१
ज्ञानेश्वर २२
हरिहर आणि बुक २५
कबीर २६
नरसी मेहता २८
नानक ३०
मीराबाई ३३
बाबर ३५
हिमू ३६
महाराणा प्रताप ३८
एकनाथ महाराज ४०
चांदबिबी ४१
अकबर ४२
शहाजहान ४४
तुकाराम महाराज ४६
गुरु गोविंदसिंह ४८
हैदर ५०
शिवाजी महाराज ५१
बाजी प्रभू ५३
स्वामिभक्त खंडोबल्लाळ ५५
महाराणी ताराबाई ५७
शूर बाजीराव ५८
चिमाजी अप्पा ६०
माधवराव पेशवे ६१
रामशास्त्री प्रभुणे ६२
महादजी शिंदे ६४
अहिल्याबाई होळकर ६६
नाना फडणीस ६८
बापू गोखले ७०
राणी लक्ष्मीबाई ७१
महात्मा ज्योतिबा फुले ७३
स्वामी विवेकानंद ७४
दादाभाई नौरोजी ७६
लोकमान्य टिळक ७८
मदन मोहन मालवीय ८०
महात्मा गांधीजी ८१
नेताजी सुभाषचंद्र बोस ८३
सरदार वल्लभभाई पटेल ८५
डॉ. राजेंद्रप्रसाद ८७
पंडित जवाहरलाल नेहरू ८९
लालबहादूर शास्त्री ९२

# सुरवातीला....

आपल्या भारताच्या इतिहासात अनेक थोर माणसे होऊन गेली. अगदी प्राचीन काळापासून आजतागायत ही परंपरा चालू आहे. राज्यकर्ते, योद्धे, धर्मसंस्थापक, समाजसुधारक, साधुसंत, स्वातंत्र्यासाठी झगडणारे वीर अशा अनेक प्रकारच्या थोर पुरुषांची नावे आपल्या इतिहासात चमकताना दिसतात. अशा थोर विभूतींपैकी पन्नास थोर पुरुषांचा परिचय 'असा इतिहास, अशी माणसे' या पुस्तकात करून दिला आहे.

वाचकांना हा प्रयत्न आवडेल, अशी आशा आहे.

श्री विठ्ठलसदन, २३ आनंदबाग,
नवी पेठ, पुणे ३०

शं. रा. देवळे

# महावीर वर्धमान



बिहार प्रांतातील एका खेड्यातील गोष्ट. गावाजवळच्या अरण्यात एक साधू ध्यान करीत बसला होता. त्याच्या हातापायांच्या जरी काड्या झाल्या असल्या तरी चेहरा मात्र ताज्या फुलाप्रमाणे टवटवीत दिसत होता. इतक्यात तिकडून एक शेतकरी आला आणि साधूला म्हणाला, "ए बैराग्या, मी जरा शेजारच्या गावी जाऊन येतो, तोपर्यंत माझा एवढा बैल सांभाळ हं!"

साधूची समाधी लागली असल्यामुळे त्याचे शेतकऱ्याच्या सांगण्याकडे बिलकुल लक्ष नव्हते. काम संपवून परत येतो तर शेतकऱ्याला बैल कुठे दिसेना. त्यावर घाबरून त्याने त्या साधूला विचारले, "ए बैराग्या, डोळे मिटून काय बसलास? माझा बैल कुठं आहे ते सांग ना!"

बैरागी काहीच उत्तर देत नाही, असे पाहून शेतकरी चिडला त्याने जवळची एक काडी उचलली व ती त्या साधूच्या कानात घालून म्हटले, "ए बहिरोबा, डोळे उघड ना. माझा बैल तुझ्याकडं सांभाळण्यासाठी ठेवला होता ना? तो कुठं आहे?"

कानात काडी गेल्यामुळे साधूच्या कानातून भळाभळा रक्त वाहू लागले. पण तरीही तो हूं की चूं देखील करीना. त्यामुळे त्या शेतकऱ्याला त्याची दया आली. हा कोणीतरी मोठा मनुष्य असावा, असे समजून त्याने त्याला साष्टांग नमस्कार घातला.

शेतकऱ्याची समजूत बरोबर होती; कारण तो साधुपुरुष म्हणजे महावीर वर्धमान होते. त्यांचे वडील कुंदग्राम येथे एक बडे सरदार होते. महावीराच्या जन्मापासून वडिलांची एकसारखी भरभराट होत गेल्यामुळे घरचे लोक त्याला 'वर्धमान' म्हणजे वाढणारा असे म्हणू लागले.

महावीर लहानपणापासून फार हुषार व गुणी होते. गुरूंनी शिकविलेल्या सर्व विद्या त्यांनी भराभरा आत्मसात केल्या. लोक त्यांचे कौतुक करीत, पण महावीरांना त्यात काहीच गोडी वाटत नसे. ते आपला सारा वेळ विचार व चिंतन करण्यात घालवीत.


आईवडिलांच्या मृत्युमुळे महावीर फार गंभीर बनले. त्यांनी उंची कपडे वापरण्याचे, पंचपक्वाने खाण्याचे व गाद्यागिरद्यांवर झोपण्याचे पार सोडून दिले. एखाद्या संन्याशाप्रमाणे ते साधे कपडे घालून व कंदमुळे खाऊन राहू लागले.

पुढे एके दिवशी भावाला विचारून ते अरण्यात निघून गेले. तेथे पार्श्वनाथ नावाच्या साधूकडून उपदेश घेऊन त्यांनी तपश्चर्येला सुरुवात केली. बारा वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर त्यांना खरे समाधान प्राप्त झाले. सर्व इंद्रियावर जय मिळविणारे म्हणून लोक त्यांना 'जिन' म्हणू लागले. त्यावरूनच त्यांच्या शिष्यांना जैन हे नाव पडले.

"खोटे बोलू नका, चोरी करू नका, कोणालाही त्रास देऊ नका. लोभ सोडा. उपासतापास करून मन व शरीर स्वच्छ ठेवा. प्राणिमात्रांना ठार न करता सर्वांवर दया करा." अशा चांगल्या चांगल्या गोष्टी सांगत महावीर सर्व बिहार प्रांतभर हिंडले. त्यांचा उपदेश ऐकून पुष्कळ लोक जैन झाले. महावीर वयाच्या ७२ व्या वर्षी मोक्षास गेले. तो दिवस दिवाळीतील अमावास्येचा होता. त्यावेळी सगळीकडे दिव्यांचा झगमगाट पसरला होता. त्या प्रकाशात महावीर स्वर्गाला गेले. म्हणून जैन लोक हा दिवस फार पवित्र मानतात.

☆ ☆

# गौतम बुध्द



हिमालय पर्वताच्या पायथ्याशी एक शहर होते. त्याचे नाव कपिलवस्तु. तेथील राजपुत्राचे नाव गौतम. राजपुत्र गौतम एके दिवशी आपल्या बागेत इकडे तिकडे हिंडत होता. फिरता फिरता त्याने हंस पक्ष्यांचा कलकलाट ऐकला. त्याने मागे वळून पाहिले. तेव्हा त्याला दिसले की, एका हंसाला बाण लागून तो खाली पडला आहे. ते पाहून गौतमाचे मन कळवळले. त्याने हाताने हलकेच तो बाण काढला आणि त्या हंसाची जखम बांधली.

इतक्यात त्याचा चुलतभाऊ देवदत्त रागारागाने त्याच्याकडे आला. तो म्हणाला, "गौतमा, या हंसाची मी शिकार केली आहे. तो मला दे."

"देवदत्ता, याला का बाण मारलास? राहू दे जिवंत याला."

"तू कोण मला विचारणार? ती माझी शिकार आहे. ज्यानं शिकार केली, त्याला ती मिळालीच पाहिजे. माझा हंस मला दे."

"अरे, असं काय करतोस? ज्यानं हंसाची सेवा करून त्याचं

रक्षण केलं, त्याच्या ताब्यात तो राहणार, की जो त्याला ठार मारणार त्याच्या ताब्यात? तू भलता हट्ट धरू नकोस."

"तुझं ज्ञान मला नको सांगू. माझा हंस मला दे."

पण हे भांडण काही मिटेना. राजापर्यंत तक्रार गेली. दोन राजपुत्रांचे भांडण होते. म्हणून राजाने न्यायाधीशाला बोलाविले आणि या भांडणाचा निवाडा देण्याची विनंती केली. न्यायाधीशाने दोघांचे म्हणणे ऐकले. तो म्हणाला, "जो रक्षक आहे त्याला हंस मिळेल, जो भक्षक आहे त्याला मिळणार नाही."

गौतमाचा विजय झाला. हंस जिवंत राहिला.

यानंतर काही वर्षांनी गौतम घरातून निघून अरण्यात गेला. कित्येक वर्षे त्याने चिंतन केले. मनुष्याचे दुःख दूर करण्याचा उपाय त्याला सापडला. तो लोकांना सांगू लागला, "जीवाचं रक्षण करावं. सत्यानं वागावं. आपलं आचरण चांगलं ठेवावं. यज्ञात देखील पशूंचा जीव घेऊ नये.'

पुढे लोक गौतमास 'बुध्द' म्हणजे 'जाणणारा' असे म्हणू लागले. गौतमबुध्दाच्या मताप्रमाणे वागणारांना 'बौध्द' म्हणू लागले. चीन आणि जपानमधील हल्लीचे बहुतेक लोक बौध्द आहेत. हिंदुधर्माचे लोकही आता यज्ञात हिंसा करीत नाहीत आणि गौतमाला देवाप्रमाणे मानतात.

☆ ☆

# आर्य चाणक्य

नदीवर आंघोळ करून एक ब्राह्मण मंत्र म्हणत रस्त्याने चालला होता. किती शांत! किती गंभीर! इतक्यात काय झाले: त्याच्या पायाला काहीतरी जोराने टोचले. तो तळमळला आणि खाली बसला. पाहतो तर पायातून रक्त आलेले! काय बरे टोचले? गवताची काडी. ती पाहताच त्याला राग आला. त्याने ती गवताची काडी खसकन उचलली, गवत मुळासकट उपटून काढले आणि काडी मोडून तोडून विस्तवात टाकून त्याने तिची राख केली; तेव्हा त्याचे समाधान झाले.

या करारी मनुष्याचे नाव कौटिल्य असे होते. त्याचे मूळचे नाव विष्णुगुप्त. त्याला चाणक्य असेही म्हणतात.

त्या वेळी मगध देशात नंद राजे राज्य करीत होते. त्यांच्या आश्रयाला कौटिल्य राहिला. तो उत्तम लेखक आणि कवी होता. एके दिवशी नंदराजाने त्याचा अपमान केला. तेव्हा त्याने प्रतिज्ञा केली, "मी नंद घराणे धुळीस मिळवीन."

नंतर कौटिल्याने मगध देश सोडला आणि तो रानोमाळ भटकत राहिला.

मगध प्रांतातील चंद्रगुप्त नावाचा राजपुत्र असाच राज्य गेल्यामुळे रानोमाळ भटकत होता. त्याच्या घराण्यास मौर्य घराणे म्हणतात. चंद्रगुप्त मौर्य आणि करारी कौटिल्य यांची भेट झाली. त्या दोघांनी मगधाचे राज्य घेण्याचा प्रयत्न केला. राज्याच्या चौफेर सीमेवर त्यांनी जनतेची मदत घेतली. चंद्रगुप्ताचे शौर्य आणि कौटिल्याचा कावेबाजपणा, शिवाय जनतेची मदत- दुधात साखर पडली!

लौकरच नंदराजाचा 'समूळ' काटा उपटला गेला आणि चंद्रगुप्तास ते राज्य मिळाले. नंतर ठिकठिकाणच्या राजांचा पराभव करून चंद्रगुप्त हा सम्राट बनला.

प्रधान कौटिल्य याने अर्थशास्त्र आणि राजनीती यावर ग्रंथ लिहिला. त्याचे नाव 'कौटिलीय अर्थशास्त्र'. राज्य कसे चालवावे, प्रजेशी कसे वागावे, शांतता सुख आणि समाधान कसे ठेवावे वगैरेसंबंधी त्यात नियम आहेत.

राजाचे हित कोणते हे सांगताना आर्यचाणक्य आपल्या अर्थशास्त्रात लिहितो, 'प्रजेचे सुख हेच राजाचे सुख. प्रजेचे हित हेच राजाचे हित. स्वत:ची इच्छा तृप्त करण्यात त्याचे हित नसते, तर प्रजेच्या इच्छेप्रमाणे वागण्यातच असते.' हेरांची व्यवस्था कशी असावी हे सांगताना आर्यचाणक्य आपल्या ग्रंथात लिहितो, 'हेरांनी मंत्र्यादिकांच्या जवळ त्यांची अबदागिरी, पिकदाणी, पादत्राणे, आसन, पालखी, वाहन इत्यादी धारण करण्याच्या निमित्ताने राहावे. ...निरनिराळ्या हेरांना परस्परांची माहिती नसावी.... व त्यांची एकवाक्यता झाल्यासच त्या बातमीवर विश्वास ठेवावा.'

अनेक राजांनी कौटिल्याच्या नियमांप्रमाणे राज्य चालविले. एकी आणि नेकी हाच संदेश कौटिल्याने जनतेस दिला. धन्य तो कौटिल्य आणि त्याचा करारीपणा!

☆ ☆

# चंद्रगुप्त मौर्य



मध्यान्ह टळून गेली होती. गावाबाहेरच्या रानात आपली जनावरे चरण्यासाठी सोडून गुराख्यांची मुले 'आज कोणता खेळ खेळावा' याचा विचार करीत होती. कोणी काही, कोणी काही सुचवीत होते. इतक्यात त्यांच्यातला एक चुणचुणीत मुलगा त्यांना गप्प करून म्हणाला, "गड्यांनो, आज आपण राजा-राजा खेळूया!"

"पण राजा कोण होणार?" मुलांनी विचारले.

"अर्थात मीच." तो मुलगा छातीवर हात ठेवीत म्हणाला.

इतरांनी त्याचे म्हणणे एकदम कबूल केले. खेळ सुरू झाला. राजा

झालेल्या मुलाने पहिलाच हुकूम सोडला, "सेनापती, सैन्य कुठं आहे? आपल्याला लढाईवर जायचं आहे ना."

राजाचा हुकूम मिळताच सेनापती इतर मुलांना एकत्र जमवू लागला. इतक्यात जवळच्या झाडाखाली बसून हा खेळ पहात असलेला एक ब्राह्मण तेथे आला व राजा झालेल्या मुलाला म्हणाला, "बाळ, तू माझ्याबरोबर येतोस? मी तुला खरोखरीचा राजा करतो."

"चला येतो," त्या मुलाने धिटाईने उत्तर दिले. "पण अगोदर गौळीवाड्यात जाऊन माझ्या आईची आपण परवानगी काढून आणली पाहिजे."

"ठीक आहे, चल" असे म्हणत त्या ब्राह्मणाने गौळीवाड्यात जाऊन आईची परवानगी आणली व त्या मुलाला घेऊन तो गावाबाहेर पडला.

हा ब्राह्मण म्हणजेच मगधाचा मंत्री आर्य चाणक्य! मगधाचा राजा धनानंद याने त्याचा अपमान केला होता. तेव्हा "तुझं राज्य धुळीला मिळवीन तेव्हाच मी माझी शेंडी बांधीन" अशी घोर प्रतिज्ञा करून तो मगधातून बाहेर पडला होता वाटेत त्याला गवळ्याच्या पोरात वाढलेला 'चंद्रगुप्त' नावाचा एक तडफदार मुलगा भेटला. त्याला हाताशी धरून चाणक्य आपल्या पुढल्या उद्योगाला लागला.

आर्यचाणक्याने चंद्रगुप्ताला सर्व प्रकारचे शिक्षण देऊन लढाईच्या व राज्यकारभाराच्या कामात चांगले तरबेज केले. मग पंजाबातील इतर काही राजांची मदत घेऊन त्यांनी धनानंदावर स्वारी केली आणि त्याला ठार मारून मगधाचे राज्य जिंकून घेतले. चंद्रगुप्त राजा झाला व आर्य चाणक्य त्याचा मंत्री बनला.

यावेळी ग्रीस देशातील काही लोकांनी आपल्या देशाचा काही भाग बळकावला होता. चंद्रगुप्ताने त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा पराभव केला. चंद्रगुप्ताचा पराक्रम पाहून ग्रीक सेनापती सेल्यूकस निकेटर याने त्याच्याशी मैत्री केली.

यानंतर चंद्रगुप्ताने सरहद्दीवरील लहानसहान राजांचा समाचार घेतला. हे राजे आपापसात भांडत. त्यामुळे परकीय लोकांना भारतावर स्वारी करण्यास संधी मिळे. अशी संधी त्यांना यापुढे मिळू नये म्हणून चंद्रगुप्ताने ही सर्व लहानमोठी राज्ये मोडून टाकून सर्वांचे मिळून एक

मोठे साम्राज्य बनविले, या साम्राज्याची व्यवस्था चंद्रगुप्ताने फार चांगली ठेवली होती. शहरांच्या व्यवस्थेसाठी त्याने हल्लीच्या नगरपालिकेसारखी मंडळे नेमली होती. संरक्षणासाठी गजदळ, रथ, घोडदळ आणि पायदळ असे चतुरंग सैन्य उभारले होते. न्याय देण्यासाठी तसेच रस्ते, कालवे इत्यादींची व्यवस्था पाहाण्यासाठी स्वतंत्र खाती पाडून प्रत्येकावर एकेक वेगळा अधिकारी नेमला होता. चंद्रगुप्ताच्या या व्यवस्थेमुळे त्याची प्रजा सुखी झाली.

चंद्रगुप्ताच्या दरबारात असलेल्या मेगॅस्थिनीस नावाच्या ग्रीक वकिलाने असे लिहून ठेवले आहे, ''येथील लोक फार सुखी व प्रामाणिक आहेत. त्यांचा एकमेकांवर फार विश्वास असतो. ते खुशाल आपली घरे उघडी टाकून बाहेर जाऊ शकतात. दिलेला शब्द ते कधीही मोडीत नाहीत. भांडणापायी कोर्ट-कचेऱ्या करण्याची पाळी त्यांच्यावर सहसा येत नाही.''

☆ ☆

# अशोक

**आ**पले राष्ट्रीय निशाण पहा. त्यावर मध्यभागी एक चक्र आहे. हे चक्र ज्या राजाचे चिन्ह होते त्या राजाचे नाव अशोक. जुन्या काळी त्यांचे राज्य साऱ्या देशभर होते. त्याच्याइतका दयाळू राजा नंतर झाला नाही. त्याच्या राजधानीचे नाव पाटलीपुत्र. हे शहर सध्याच्या पाटणा शहराच्या जवळच होते. आज पाटणा ही बिहार प्रांताची राजधानी आहे.

अशोकाला राज्य करायला लागून थोडी वर्षे झाली होती. पाटलीपुत्रापासून जवळच कलिंग देशात म्हणजे सध्याच्या ओरिसा प्रांतात दुसरे राज्य होते. अशोक पराक्रमी होता. त्याला वाटले की, हे राज्य आपण जिंकले पाहिजे. त्याच्याजवळ हत्ती, घोडे, रथ, पायदळ या चारही प्रकारची सेना होती. तिच्यासह त्याने कलिंगावर हल्ला केला. या देशातील लोक आणि राजा शूर होते. त्यामुळे लढाई फार दिवस

चालली. पण अशोकाजवळ सेना पुष्कळ असल्याने त्याचा जय झाला.

विजयानंतर अशोक कलिंग देशात फिरतीवर निघाला. प्रत्येक घरी त्याने लोक रडताना पाहिले. कारण प्रत्येक घरचा एक तरी माणूस या लढाईत मरण पावला होता. जिकडे तिकडे जाळपोळ झाली होती. त्यातच दुष्काळाने प्रजेला खाण्यासही मिळत नव्हते. लोकांचे हे हाल पाहून अशोकास वाईट वाटले. तो म्हणाला, "आपण लढाई केली आणि लोकांना त्रास दिला. आपलंच चुकलं!" यामुळे त्याला अन्नही गोड लागेना. मनाला समाधान मिळेना. त्याने निश्चय केला की, राज्य मिळवण्यासाठी आता कधीही लढाई करायची नाही. गौतमबुध्दाच्या एका शिष्याकडून त्याने बौध्दधर्माची शिकवण समजावून घेतली. ती त्यास पटली आणि मग त्याच्या मनास शांतता मिळाली.



सर्व राज्यात अशोकाने प्राण्यांचा वध करण्यास बंदी केली. माणसांसाठी आणि जनावरांसाठी त्याने दवाखाने उघडले. बौध्द धर्माचा उपदेश करण्यासाठी दूरदूरच्या देशात त्याने आपले दूत पाठविले. रस्तोरस्ती त्याने दगडांचे खांब उभे केले. त्यावर कोरले की, "कोणीही हिंसा करू नये, सत्याने

वागावे, शेजाऱ्याला मदत करावी.'' गिरनारच्या लेखात त्याने लिहिले आहे की, ''जो आपल्या पंथाची पूजा करतो आणि परक्यांची निंदा करतो त्यास वाटते की, आपल्या सांप्रदायाची आपण प्रगती केली; पण खरे म्हणजे तो त्या पंथाचा घात करतो.देवप्रिय (अशोक) सर्व पंथांना मान देतो.''

अशोकाच्या या वृत्तीमुळे बुध्द धर्मांचा प्रसार झाला तरी भारतात हिंदू व बौध्द यांच्यात दंगे झाले नाहीत. अशोकाने शिल्पकलेला उत्तेजन दिले आणि विद्वानांना मान दिला. जगाच्या इतिहासात, सम्राट असूनही साधुत्त्वाने वागणारा राजर्षी कोणता? असे विचारले तर सम्राट अशोक हेच उत्तर येईल.

हिंदुस्थानात पुष्कळ नवी राज्ये आली आणि नष्ट झाली. परंतु अशोकाने सांगितलेला मानवधर्म येथे आजही चालू आहे. हाच अशोकाचा खरा विजय होय.

☆ ☆

# समुद्रगुप्त

एका मोठ्या राजवाड्यात सोन्याचा नक्षीदार सिंहासनावर तो देखणा राजा बसला होता. त्याच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास दिसत होता. त्याच्या समोरच दुसऱ्या एका सिंहासनावर लंकेचा राजा बसला होता. त्याचे नाव मेघवर्मा.

''समुद्रगुप्त महाराज!'' मेघवर्मा गंभीर आवाजात पण अदबीने बोलू लागला. ''आपल्या सारख्या थोर आणि पराक्रमी सम्राटाशी मैत्री असणे, यासारखे भाग्य कोणते? आपण आमच्या मैत्रीचा स्वीकार करावा.'' असे म्हणून आपल्या जागेवरून उठून राजा मेघवर्मा समुद्रगुप्तापुढे आला आणि सेवकास खुणावून त्यानं एका सुवर्ण तबकातील नजराणा सम्राट समुद्रगुप्ताच्या पुढे ठेवला.

समुद्रगुप्ताने सम्राटास शोभेल अशा रीतीने त्या नजराण्याचा स्वीकार केला आणि राजा मेघवर्मा यास आपल्या शेजारी बसवून घेतले. ''मित्रा

मेघवर्मा, तू माझा मंडलिक राजा नव्हेस, तर समुद्रगुप्ताचा एक स्नेही आहेस. आपली मैत्री अजरामर राहू देत."

सारा दरबार आनंदाने फुलला. "केवढा उदार सम्राट! खरा महाराजा शोभतो." लोक आपआपसात बोलू लागले. दरबार संपला.

गुप्त घराण्यातील पहिल्या चंद्रगुप्ताचा मुलगा सम्राट समुद्रगुप्त होय. तो लहानपणापासून मोठा तडफदार आणि युद्ध कलेत निपुण होता. चंद्रगुप्ताचे त्याच्यावर भारी प्रेम! राज्य चालवायला हाच युवराज खरा लायक आहे असे चंद्रगुप्तास वाटे आणि त्याप्रमाणे त्याने समुद्रगुप्तास आपल्या हातांनी राज्याभिषेक करविला. इ. स. ३३० मध्ये समुद्रगुप्त राज्यकारभार चालवू लागला.

राजा झाल्यावर प्रथम त्याने आपल्या विरोधकांचा खंबीरपणे नायनाट केला. राज्याची व्यवस्था नीट लावली आणि मग भोवतालच्या प्रांतांकडे आपले लक्ष वळविले.

समुद्रगुप्ताने आपल्या पराक्रमी सैन्यासह उत्तर हिंदुस्थानातील भाग जिंकण्यास सुरुवात केली. मगध मधील गुप्तांची कीर्ती अनेक राजे ऐकून होतेच. समुद्रगुप्ताने काबूलपासून आसामपर्यंत सर्व देश जिंकले. ओरिसाचा राजा व्याघ्र, गोदावरी मुखाजवळील प्रदेशाचा राजा महेंद्र, महाराष्ट्रातील राजा कुबेर या सर्वांना पराभूत करून त्यांना आपले मांडलिक केले आणि जिंकलेली राज्ये परत दिली. भारताचा सम्राट व्हावे अशी त्याची महत्त्वाकांक्षा हळूहळू आकार घेऊ लागली.

समुद्रगुप्ताच्या पराक्रमाने प्रभावित होऊन अनेक राजे स्वत:हून त्याचे मित्र बनले. त्याने त्यांच्याशी मैत्रीचे तह केले. लंकेचा राजा मेघवर्मा हा अशाच राजांपैकी एक होय. समुद्रगुप्त हा वैदिक धर्माचा म्हणजे हिंदू धर्माचा होता; तरीही मेघवर्म्याने विनंती करताच समुद्रगुप्ताने बुद्धगयेस बुद्ध भिक्षूंसाठी एक मोठी धर्मशाळा बांधून दिली.

सर्व भारतावर एकछत्री अंमल बसविल्यावर त्याने परंपरेनुसार अश्वमेघ यज्ञ केला. स्वत:च्या शिक्क्याची सुवर्णनाणी पाडली. दूरदूरच्या राजांना, पंडितांना यज्ञाला बोलावून त्यांचा सत्कार केला आणि सम्राटास शोभेसा दानधर्म केला. या प्रसंगाचे वर्णन अलाहाबादच्या किल्ल्यातील अशोक स्तंभावर संस्कृत भाषेत खोदलेले आढळून येते.

समुद्रगुप्त हा वैदिक धर्माचा मोठा अभिमानी होता. तो विष्णुभक्त होता. इतर धर्मांचा द्वेष न करता स्वधर्माचा अभिमान त्याच्या ठिकाणी होता. समुद्रगुप्त मोठा रूबाबदार होता. तो देखणा, भव्य आणि शूर होता. प्रसंगी रणात क्रूर पण स्वभावाने उदार असा त्याचा स्वभाव होता. प्रजेकरिता धर्मशाळा, अन्नछत्रे, पाणी पिण्यासाठी विहिरी वगैरे सोई त्याने करून ठेवल्या.

समुद्रगुप्त पराक्रमी होता तसाच विद्वान होता. पंडितांशी तो चर्चा करी. तो काव्यरचना करी. गायन आणि वीणावादन या कला त्याला अवगत होत्या. त्याने संस्कृत भाषेला उत्तेजन देऊन तिला राजभाषेचा मान दिला. असा हा शूर व विद्वान राजा समुद्रगुप्त इ. सन ३७५ मध्ये मरण पावला.

☆ ☆

# हर्ष

हर्ष सिंहासनावर बसला त्या वेळी अवघा सोळा वर्षांचा होता. आपल्या देशावर स्वाऱ्या करणाऱ्या शत्रूंचा नाश करावा, कपटी राजांचा नायनाट करावा आणि सर्व देशभर एकछत्री राज्य करावे, असा सल्ला मंत्र्यांनी त्याला दिला. असे केल्याने देशात शांतता आणि सुव्यवस्था राहील हे हर्षासही पटले. त्याने आपल्या सैन्याची नीट व्यवस्था केली आणि त्या सैन्यासह तो शेजारचे देश जिंकायला निघाला.

आपले राज्य मान्य करा म्हणजे लढाईमुळे होणारे नुकसान टळेल. अशी पत्रे त्याने अनेक प्रांतांच्या राजांना पाठविली. नंतर आपली राजधानी स्थानेश्वर ही सोडून तो शेजारच्या राज्याच्या सीमेवर सरस्वती नदीच्या काठी पोहोचला. तेथे त्याने सैन्याचा तळ ठोकला. त्या नगराच्या मुख्याने हर्षाचे स्वागत केले. आणि त्याला भेट म्हणून अंगठी दिली. ही आंगठी बोटात घालीत असता हर्षाच्या हातून ती खाली पडली. सैनिकांना वाटले, 'प्रारंभीच हा अपशकुन झाला, आता कसली आपण राज्ये जिंकणार ?'

हर्ष हा चतुर आणि प्रसंगावधानी राजा होता. जमिनीवर चिखलात पडलेली ती आंगठी त्याने वर उचलली आणि तो लोकांना म्हणाला, "ही पहा शुभ आंगठी. ह्या माझ्या आंगठीचा ठसा या जमिनीवर पहा कसा चांगला उठला आहे! माझ्या राज्याची छाप सर्वत्र अशीच पडणार, याचे हे लक्षण होय." यामुळे सैनिकांच्या मनात पुन्हा उत्साह निर्माण झाला. सहा वर्षे अनेक ठिकाणी लढाया करून हर्षाने पंजाबपासून बंगालपर्यंतचा देश आपल्या ताब्यात आणला.



हर्ष हा विद्वान आणि दयाळू राजा होता. बाणभट्ट आणि जयसेन नावाचे कवी त्याच्या दरबारात होते. तो दर पाच वर्षांनी आपली सगळी संपत्ती गरीब, ब्राह्मण आणि श्रमण म्हणजे बौद्ध साधू यांना देऊन टाकीत असे. यावेळी चीनमधील ह्यू-एनत्संग हा प्रवासी येथे आला होता. त्याने हर्षाच्या गुणांचे रसभरीत वर्णन केले आहे.

☆ ☆

# दुसरा पुलकेशी



ललकारी झाली. आणि सम्राटांची स्वारी दरबारात आली. सर्व सभेने उठून राजाचे स्वागत केले. राजसेवकांनी चवऱ्या ढाळावयास सुरुवात केली. पुन: ललकारी झाली. खास राजदूत आला. त्याने राजाला प्रणाम केला. राजाने विचारले, "हं काय?"

राजदूत म्हणाला, "महाराज, सम्राट हर्षाचे सैन्य नर्मदा नदी पार होऊन आपल्या राज्यात घुसत आहे. राजा हर्षाचा आपणास निरोप आहे. आपण दक्षिणेकडील सम्राट असाल, पण माझ्या साम्राज्याची हद्द माझ्या पराक्रमाने अजून ठरावयाची आहे. असेल शक्ती तर या आणि अडवा मला! तुमचे निरोप नकोत!"

राजाने चहूकडे पाहिले. सर्वांचे डोळे राजाकडे लागले. राजाने ताबडतोब आज्ञा केली, "ठीक आहे, आजच स्वारीची सिद्धता करा. दक्षिण सम्राटाची शक्ती रणांगणावर कळत असते हे राजा हर्षाला समजलेच पाहिजे!" राजसभा संपली.

काही दिवसानी राजाचे शब्द खरे ठरले. याच पराक्रमी पुलकेशी

राजाच्या सैन्याने सम्राट हर्षाचा पराभव केला आणि त्याला नर्मदा नदीच्या उत्तरेला पिटाळून लावले. असा कोण बरे हा पराक्रमी राजा? हा चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी. सुमारे साडे तेराशे वर्षांपूर्वी विजापूरजवळ बदामी येथे चालुक्य राजे राज्य करीत होते. त्यापैकी दुसरा पुलकेशी हा शूर योद्धा होता. त्याने आपले उत्कृष्ट सैन्य तयार केले. त्याने गुजरात, माळवा, कोकण इत्यादी भागावर स्वाऱ्या केल्या. नर्मदा नदीच्या दक्षिणेपासून कावेरी नदीपर्यंत त्याने आपले राज्य वाढविले.

पुलकेशीच्या काळात भडोच, सुरत, सोपारा वगैरे बंदरातून परदेशांशी व्यापार चाले. पुलकेशीची कीर्ती दूर देशांतही पोहोचली. इराणचा शहा दुसरा खुश्रू याने आपला वकील पुलकेशीच्या दरबारात पाठविला होता. या वकिलाने पुलकेशीची त्याच्या दरबारात भेट घेतली. या प्रसंगाचे उत्कृष्ट चित्र अजिंठ्याच्या लेण्यात रंगविलेले आहे. पुलकेशीने शिल्पकलेलाही उत्तेजन दिले. बदामीची लेणी आणि घारापुरीची लेणी या लेण्यांचे उत्तम कोरीव काम त्याच्याच कारकीर्दीत झाले. त्याने मोठमोठाली देवळे बांधली.

पुलकेशीच्या दरबारात ह्युएनत्संग हा चिनी प्रवासी आला होता. पुलकेशीसंबंधी ह्युएनत्संग लिहितो, ''पुलकेशी हा राजा उदार असून तो मोठा धोरणी आहे. त्याचे औदार्य आणि दातृत्व फार मोठे आहे. त्याची प्रजा राजनिष्ठ असून ती त्याची तत्परतेने सेवा करणारी आहे. खऱ्या योद्ध्याला शोभेल अशी त्याची वागणूक आहे. तो युद्धातील जयाला अतिशय महत्त्व देतो. त्याच्या राज्यातील घोडदळ आणि पायदळ सुसज्ज आहे. सैन्यातील शिस्त कडक आहे. राजाच्या हत्तीखान्यात शेकडो हत्ती आहेत. ते युद्धासाठी तयार असतात. लढाईचा क्षण येताच हे मत्त झालेले हत्ती शत्रूच्या सैन्यावर तुटून पडतात. पुलकेशीच्या राज्यात शांतता आणि सुबत्ता होती.'' पुलकेशीने अनेक राज्ये जिंकली. त्यामुळे त्याला शत्रूही पुष्कळ होते. कांचीचा पल्लव राजा नृसिंहवर्मा याच्याशी लढताना पुलकेशी मारला गेला.

☆ ☆

# श्रीशंकराचार्य



पूर्णा नदी जोराने वाहात होती. तिला पाणीही खूप होते. काहीजण आत पोहत होते. काही घाटावर उभे होते. स्त्रिया, पुरुष, मुले यांची घाटावर गर्दी होती. इतक्यात एक मुलगा ओरडू लागला, ''आई, मला आता पोहता येत नाही. माझा पाय मगरीने धरला आहे. मला आता संन्यास घेऊ दे, म्हणजे मी सुखाने मरतो. ए आई!''

त्या मुलाची आई घाटावर होती. ती रडत होती. पाण्यात जाऊन त्यास कोणीच सोडवीना. बिचारी आई काय करणार? ती म्हणाली, ''घे बाबा संन्यास घे.''

पण काय आश्चर्य! ''मी संन्यास घेतो'' असे मुलाने म्हणताच मगरीने आपली मिठी सोडली. लगेच वेगाने पोहत शंकर तीरावर आला.

हा मुलगा म्हणजेच प्रसिद्ध जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य. विवाह करण्यापूर्वीच संन्यास घेण्यास आई त्यांना परवानगी देईना. पण मगरमिठीतून सुटताना त्यांना ती परवानगी मिळाली. लवकरच ते शास्त्रांचा अभ्यास करू

लागले. गोविंदनाथ हे त्यांचे गुरु. त्यांचा आशीर्वाद घेऊन ते सर्व देशभर हिंडले. त्यांनी हिंदू धर्माची शिकवण लोकांना दिली. 'सर्वत्र एकच देव आहे. जग खोटे म्हणजे कायम न टिकणारे आहे आणि ब्रह्म खरे म्हणजे कायम टिकणारे आहे. त्याचे ज्ञान मिळवा,' हा त्यांचा उपदेश होता. श्रीगीता आणि उपनिषदे या धर्मग्रंथांचा अर्थ स्पष्ट करणारी पुस्तके त्यांनी लिहिली. सभांतून पंडितांच्या प्रश्नांना ते बरोबर उत्तर देत. त्यामुळे त्यांचे शिष्य वाढले.

दक्षिण हिंदुस्थानातील पूर्णा नदीच्या काठी कालडी या नावाचे गाव आहे. या गावी शंकराचार्यांचा जन्म झाला. शिवगुरू व श्रीअंबिका यांचा हा मुलगा.

दक्षिणेपासून हिमालयापर्यंत त्यांनी प्रवास केला, व्याख्याने दिली आणि हिंदूंना खरा मोक्षमार्ग दाखविला. ते काश्मीर प्रांतातही गेले होते. तेथे शारदा-अंबेचे देऊळ आहे. त्याचे दार नेहमी बंद असे. जो जगातील पंडितांना जिंकील तोच हे दार उघडू शकेल असा लोकांचा समज होता. शंकराचार्यांनी या देवळाचा दरवाजा तेव्हाच उघडला. त्यांच्या ज्ञानाला त्याकाळी सर्वांनी मान दिला.

या थोर पुरुषाने अवघ्या बत्तिसाव्या वर्षी समाधी घेतली.

☆ ☆

# रझिया

दिल्लीच्या सिंहासनावर अनेक राजे होऊन गेले. पण त्या तक्तावर स्त्री राणी झाल्याची उदाहरणे अगदी थोडी आहेत.

सुलतान इल्तमश मरण पावला. नंतर त्याचा वडील मुलगा गादीवर बसणार म्हणून लोकांत खळबळ उडाली. कारण तो मुलगा आळशी, चैनी आणि निर्दय होता. अशा भागूबाईला गादीवर बसविण्यापेक्षा त्याची बहीण रझिया हिलाच राणी करण्याचे सरदारांनी ठरविले.

तिचे वडिल इल्तमश यांनीच प्रधानांना सांगून ठेवले होते की माझ्यामागून रझियालाच गादीवर बसवा. यावर प्रधानाने विचारले, "बादशहा! आपल्याला

मुलगे असताना आपण मुलीला वारस नेमता हे कसे?"

बादशहा म्हणाला, "माझ्या मुलांना राज्यकारभार काही कळत नाही. माझी रझियाच हुषार आहे. मी असे का करतो ते तुम्हाला पुढे प्रत्यक्षच कळून येईल."

रझिया ही दीर्घोद्योगी, काटकसरी आणि दयाळू होती. लहानपणापासून ती सतत वडिलांबरोबर असे, म्हणून राज्यकारभाराची तिला चांगली माहिती झाली होती. वडिलांच्या हातून एखाद्या वेळी अन्याय झाला तर ती चूक लाडकी रझिया चटकन् सुधारून देई. गरिबांचे सुखदुःख ती स्वतः पाही. सर्व लोकांना ती फार आवडे, म्हणूनच लोकांच्या इच्छेप्रमाणे ती दिल्लीची राणी बनली. सर्वांना आनंद झाला.

कारभार हातात घेतल्यावर तिने भावास कैदेत ठेविले आणि त्याच्या चैनीस आळा घातला. गोरगरिबांना अन्न, वस्त्र आणि निवारा मिळण्याची तिने तजवीज केली.

रझिया मोठी धीट होती. ती पुरूषाचा पोषाख करून ऐटीने दरबारात बसे. सरकारी [illegible] ती स्वतः पाही. अधिकारी लोक तिला भिऊन वागत. जुलमी कायदे आणि वाईट चालीरीती तिने एकदम बंद केल्या. तिने दिल्लीचे राज्य चांगले चालविले. स्त्रियाही राज्य चांगले चालवू शकतात हे तिने जगाला दाखवून दिले.

आपल्यावर एका स्त्रीने राज्य करावे आणि सत्ता गाजवावी हे काही सरदारांना पसंत पडले नाही. त्यांनी रझियाला मारण्याचा कट केला आणि शेवटी रझियाचा खून झाला.

☆ ☆

# ज्ञानेश्वर महाराज

**के**वढी सभा भरली होती. पैठण गाव विद्वानांचे माहेर. सारे विद्वान आणि शास्त्री-पंडित सभामंडपात आले. कशासाठी?

ती पाहा. चार गोजिरवाणी मुले मंडपात आली. सगळ्यांचे लक्ष त्यांच्याकडे लागले. सगळेजण बसले. त्यातला एक मुलगा म्हणाला

"आम्ही आळंदीहून आलो आहोत. आम्हांला आळंदीकरांनी पाठविले आहे. आपण आमच्या मुंजी करा. आम्ही आपलीच लेकरे आहोत." मोठे मोठे शास्त्री या मुलांना हसले.

एक शास्त्रीबुवा म्हणाले, "काय रे, नावे काय तुमची?" थोरला मुलगा पुन्हा उठला. गोड आवाजात म्हणाला, "माझं नाव निवृत्ती, हा माझा भाऊ ज्ञानेश्वर, हा सोपान आणि ही माझी बहीण मुक्ता."

दुसरे शास्त्री म्हणाले, "हा कोण? ज्ञानेश्वर का? काय ईश्वर कुठे आहे? आहे माहीत?"

ज्ञानदेव उठले, "परमेश्वर सर्वांभूती आहे."

तिसरे शास्त्रीबुवा म्हणाले, "वा! वा! तो बघ रेडा चालला आहे. त्याच्यात आहे का परमेश्वर?"



ज्ञानदेव म्हणाले, "आहेच त्यात परमेश्वर!"

शास्त्रीबुवा उठले, "मग काय? आम्ही शास्त्रीपंडित आणि हा रेडा सारखेच का? आम्ही वेद म्हणतो आणि-"

ज्ञानदेव म्हणाले, "त्याला का नाही म्हणता येणार? हे पाहा

हं. म्हण आता अग्निऽमीळे पुरोहितं..."

रेड्याच्या डोक्यावर ज्ञानदेवांनी हात ठेवला आणि काय आश्चर्य! रेडा म्हणू लागला. "अग्निऽमीळे पुरोहितं..."

शास्त्री-पंडितांचा गर्व नाहीसा झाला. ते म्हणाले, "ज्ञानदेवा! तुम्ही शुद्धच आहात! आम्ही तुम्हांला शरण आहोत!"

हेच ज्ञानेश्वर महाराज. यांचा जन्म सुमारे ७०० वर्षांपूर्वी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत आणि आईचे नाव रखमाबाई. त्यांचे मूळ गाव पैठणच्या जवळचे आपेगाव. काशीला विठ्ठलपंत यात्रा करीत करीत आले. तेथे त्यांनी संन्यास घेतला. पण नंतर गुरुजींच्या आज्ञेवरून संन्यास सोडून त्यांनी संसार केला. विठ्ठलपंतांना निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ताबाई अशी चार मुले झाली. संन्यास घेतल्यावर पुन्हा संसार करणे पाप आहे, असे सांगून आळंदीच्या लोकांनी विठ्ठलपंतांचा छळ केला. त्या छळाला कंटाळून विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई यांनी नदीत उडी मारून जीव दिला. त्यामुळे मुले पोरकी झाली. आळंदीला त्यांचा छळ झाला म्हणून ती पैठणला गेली. ज्ञानेश्वरांनी पैठणला एक मोठा चमत्कार करून दाखविला. त्यांनी एका रेड्याकडून वेद म्हणून दाखविले.

तो चमत्कार पाहून पैठणच्या शास्त्रीपंडितांना मोठे आश्चर्य वाटले. ज्ञानेश्वर वयाने लहान असले तरी मोठे योगी आहेत अशी सर्वांची खात्री झाली.

पैठणहून फिरत फिरत ही भावंडे नेवासे येथे आली. तेथे ज्ञानेश्वरांनी वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सांगितला. तो सच्चिदानंद बाबांनी लिहून घेतला. ज्ञानेश्वरांची वाणी रसाळ आणि सोपी होती. संस्कृत ग्रंथातील अवघड विषय सोपा करून सांगण्याची हातोटी त्यांना साधली होती. अगदी अडाणी माणसाला देखील त्यांनी देवाच्या भक्तीचा रस्ता दाखविला ज्ञानदेवांनी लोकांना पुढील उपदेश केला-

**एक तत्त्व नाम दृढ धरी मना**
**हरीसी करुणा येईल तुझी**
**ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद**
**वाचेसी सद्गद् जपा आधी**

**नामा परते तत्त्व नाही रे अन्यथा**
**वाया आणिक पंथा जाशिल झणी**
**ज्ञानदेवा नाम जपमाळ अन्तरी**
**धरोनि श्रीहरी जपे सदा**

ज्ञानेश्वर मोठे संत होते तरी त्यांना गर्व नव्हता. त्यांच्या काळी चांगदेव नावाचे एक प्रसिद्ध योगी होते. ते एकदा वाघावर बसून ज्ञानेश्वरांच्या भेटीस आले. ज्ञानेश्वर आपल्या भावंडासह एका भिंतीवर बसले होते. त्यांनी भिंतच चालविली. हे पाहून चांगदेव मनात खजील झाले. ज्ञानेश्वरांनी जी भिंत चालविली ती अजूनही आळंदीस दाखवितात.

ज्ञानेश्वर महाराजांनी आळंदीला जिवंत समाधी घेतली. आजही लोक आळंदीला जाऊन ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतात.

☆ ☆

# हरिहर आणि बुक्क

**अ**नागोंदीच्या जवळ एक खूप मोठे मैदान होते. त्याच्या तिन्ही बाजूंना टेकड्या व चौथ्या बाजूस तुंगभद्रा नदी होती. ही जागा ज्यांनी राजधानी म्हणून निवडली त्यांची नांवे हरिहर व बुक्क! या राजधानीचे नाव त्यांनी विजयनगर ठेवले.

हरिहर आणि बुक्क हे दोघे राजपुत्र होते. हरिहरास हक्क असेही म्हणत. तेलंगणातील वरंगळ प्रांतातील त्यांचे राज्य मुसलमानांनी घेतल्यामुळे ते या भागात भटकत आले. त्याच सुमारास विद्यारण्य स्वामींची आणि त्यांची भेट झाली. हे स्वामी विद्वान, हिंदूधर्माचे प्रचारक आणि शृंगेरीच्या मठाचे मुख्य होते. त्यांनी या राजपुत्रांना चांगले सेवक, सल्लागार आणि धन मिळवून दिले.

हरिहर आणि बुक्क हे गुलबुर्गा आणि बिदर येथील परक्या मुसलमान राजांशी सतत लढले. या राजांच्या हल्ल्यांपासून लोकांचा धर्म आणि संस्कृति त्यांनी वाचविली. जे कार्य शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रांत केले, तेच कार्य त्यांच्यापूर्वी तीनशे वर्षे कर्नाटकात या राजांनी केले.

हे हिंदू राज्य तुंगभद्रेपासून कन्याकुमारीपर्यंत पसरले होते व दोनशे वर्षे टिकले.

विजयनगर ही राजधानीची जागा त्यांनी निवडली त्याची एक कथा सांगतात. हरिहर या भागात शिकारीला गेला होता. त्याने पाहिले की, एक ससा कुत्र्याच्या पाठीमागे लागला आहे! खरे म्हणजे कुत्रा पाहिला की ससा जीव घेऊन पळायचा, पण येथे पाहातो तो उलट प्रकार झालेला. त्याने ही विचित्र घटना विद्यारण्यांना सांगितली. 'हा मोठा शकुन आहे' असे स्वामींनी त्यास सांगितले आणि तेथेच त्यांनी राजधानी केली. हे शहर पुढे फार वैभवास चढले. या शहराच्या नावारून हरिहरच्या राज्यास विजयनगरचे साम्राज्य असे नाव मिळाले.

☆ ☆

# कबीर

**निरू** हा एक मुसलमान कोष्टी आणि निमा ही त्याची बायको. पहाट झाली. निरू आणि निमा नदीवर निघाली. तोच-

"लहान पोर रडल्याचा आवाज ऐकलास का तू?" निरू निमाला म्हणाला. "हा! हा! पण इतक्या सकाळी इथं लहान मूल..." निमा बोलत होती तोच निरू धावला. "निमा, निमा, इकडे ये हे बघ," निरू म्हणाला. निमा झटकन गेली. तोच त्यांना काय दिसले? मऊ मऊ हिरवळीवर एक लहानसे गोजिरवाणे मूल होते. ते क्षणात हसे, क्षणात रडे.

निमाने ते मूल झटकन उचलले. त्याला आपल्या पोटाशी धरले. ते खुदकन हसले. निरू आणि निमा यांना खूप आनंद झाला. "देवानंच हा मुलगा आपल्याला दिला आहे. हाच आपला मुलगा."

"पण याचं नाव काय ठेवू या?" निमाने विचारले.

"कबीर" निरू म्हणाला.

अशा प्रकारे कबीर निरू कोष्ट्याच्या घरी मोठा होऊ लागला.

निरू धर्माने मुसलमान होता. तो कोष्ट्याचा धंदा करून कसेबसे पोट भरी. कबिराला तो शिकवू शकला नाही. पण कबीर उपजतच

हुषार होता. समजू लागल्यापासून तो हिंदीमध्ये पदे रची आणि देवाचे भजन करी. त्याचे विणकाम आणि भजन एकदमच चाले. त्यावेळी रामानंद नावाचा प्रसिद्ध साधू काशीस होता. त्याचे शिष्य पुष्कळ होते. आपणही त्याचा शिष्य व्हावे असे कबिराला वाटले. पण रामानंदांच्या मठात मुसलमान कोष्टी असलेल्या कबिरास कसा प्रवेश मिळावा?



रामानंदांना तर गुरु करावयाचा, असे कबिराने ठरविले. कबिराला कळाले की, रामानंद रोज पहाटे गंगेवर आंघोळीला. जातात. हे कळल्यावर कबीर एके दिवशी मोठ्या पहाटेच उठला. आणि गंगेच्या घाटावर गेला. वेळ पहाटेची होती. सगळीकडे अंधारच होता. कबीर आपल्या अंगाची घडी करून रामानंदाच्या वाटेत बसला. रामानंद आले. घाटाच्या पायऱ्या उतरू लागले. उतरता उतरता त्यांचा पाय कबिराला लागला. तेव्हा त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले, "राम राम!"

मग रामानंदानी कबिराची चौकशी केली. आपला शिष्य होण्यास हा लायक आहे, हे जाणून रामानंदांनी त्यास आपला शिष्य केले. पुढे तो मोठा झाल्यावर त्याचे भजन ऐकण्यास लोक जमा होऊ

लागले. त्यात हिंदू येत आणि मुसलमानही येत.

कबिराचा धर्म मुसलमानी. पण तो भजन करी रामाचे. तो म्हणे-

''भजो रे भैया । राम गोविंद हरी ।
जप-तप साधन । कुछ नही लागत
खरचत नही गठरी ॥

तसेच तो सांगे की, राम आणि रहीम एकच आहेत. मनापासून भक्ती केली म्हणजे देव पावतो. भजन करणारा कोणत्या जातीचा आहे हे देव पाहात नाही. पुष्कळ लोकांना त्याचे म्हणणे आवडले. काही मुसलमानांना हा उपदेश पटला नाही. त्यांनी सुलतानाकडून त्याला शिक्षाही देवविल्या.

काशीजवळ मगहर नावाचे ठिकाण आहे. तेथे मनुष्य मेला तर तो नरकात जातो असे लोक समजत. अशा रूढीवर कबिराचा विश्वास नव्हता म्हणून तो स्वत: मगहरलाच जाऊन राहिला आणि तेथेच मरण पावला.

कबिराने जी पदे रचली त्यास 'साखी' असे म्हणतात. अनेक साख्यांचा संग्रह त्याच्या शिष्यांनी एकत्र केला आहे. हिंदू आणि मुसलमान धर्मीयांत त्याचे शिष्य आहेत. ते स्वत:स 'कबीरपंथी' म्हणवितात. आजही कित्येक लाख लोक या पंथात आहेत.

☆ ☆

# नरसी मेहता

नरसी मेहताच्या घरी गावजेवण होते. खरे पाहाता गावजेवण घालण्याची त्याची ऐपत नव्हती. सारा वेळ ईश्वर चिंतनात घालविणाऱ्या माणसाजवळ गावभोजन घालण्याइतका पैसा कोठून असणार? पण याबद्दल नरसीजींना अद्दल घडावी व त्यांनी देव-देव सोडून उद्योगधंद्याला लागावे, म्हणून शेजाऱ्या पाजाऱ्यांनी हा बेत चालविला होता.

जेवणाची तयारी झाली. ब्राह्मणांच्या पंक्ती बसल्या. इतक्यात भातावर

वाढायला तूप नाही असे पाहून नरसीजीची बायको म्हणाली, "हे भांडे घ्या आणि चटकन् बाजारातून तूप आणा पाहू. लवकर या हं ब्राह्मण खोळंबून बसले आहेत."

भांडे घेऊन नरसीजी बाजारात निघाले. वाटेत त्यांना काही भजनी मंडळी भजन करताना दिसली. नरसीजीही त्यात सामील झाले.

जरा वेळाने त्यांना तूप आणण्याची आठवण झाली. लगेच ते बाजारात गेले व तूप घेऊन घरी आले. तुपाचे भांडे बायकोच्या हाती देताना ते म्हणाले, "माझ्या हातून चूक झाली हं, पण त्यामुळे तुमचा मात्र खोळंबा झाला असेल! आता हे तूप घे अणि लवकर वाढ जा पाहू."

"अहो, ब्राह्मणांच्या पंक्ति तर मघाशीच जेवून उठल्या. तुम्हीच नाही का मला तूप आणून दिलेत." नरसीची बायको हसत हसत म्हणाली.

नरसी विचार करू लागले. 'आपण तर भजनात दंग होतो. मग हे तूप कोणी आणून दिले? परमेश्वरानेच तर आपली अब्रू राखली नसेल ना?'

अगदी लहानपणापासून नरसीजींचा श्रीकृष्णावर विश्वास होता. त्यांचे आई-वडील ते लहान असतानाच वारले. पुढे त्यांचा सांभाळ त्यांचा भावाने केला. नरसीजी आपला सारा वेळ भजन पूजनात घालवितात हे पाहून त्यांची भावजय त्यांना म्हणाली, "भाऊजी, तुम्ही सारा वेळ त्या श्रीकृष्णाच्या नावाने टाहो फोडीत असता, एकदा समक्षच त्याच्या भेटीला का जात नाही?"

भावजयीचे हे शब्द नरसीजींना फार लागले. त्यांनी लगेच घरदार सोडले व दूर जंगलात जाऊन ते परमेश्वराचा धावा करू लागले. असे म्हणतात की याच वेळी श्रीकृष्णाने त्यांना दर्शन दिले.

देव पावल्यानंतर ते पुन्हा घरी आले व आपल्या मुलामुलींची लग्ने करून देऊन पुन्हा ते श्रीकृष्ण भक्तीत दंग झाले. बायकोच्या मृत्यूनंतर ते गावोगाव हिंडून लोकांना उपदेश करू लागले. त्यांचा उपदेश साधा व सरळ असे, "वैष्णवजन तो तेने कहिये जो पीड पराई जाने रे" म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारा तोच खरा

भक्त'' असे ते म्हणत. त्यांचे हे पद महात्मा गांधींना फार आवडे.

नरसीजीचे वाढते महत्त्व गुजरातच्या राजाला सहन होईना. त्याने त्यांना बोलावून सांगितले, ''ही माळ घ्या व देवाच्या गळ्यात घाला. तुमची भक्ती खरी असली तर उद्या दिवस उजाडण्याच्या आत देव हीच पुन्हा तुमच्या गळ्यात घालील. तसे न झाल्यास तुमची भक्ती खोटी आहे असे समजून मी तुम्हांला ठार करीन.''

राजाच्या सांगण्याप्रमाणे नरसीजी देवळात गेले. त्यांनी ती माळ देवाच्या गळ्यात घालून भजनाला सुरुवात केली. सारी रात्र त्यांचे भजन चालू होते. शेवटी असे म्हणतात की, पहाटे श्रीकृष्णाने त्याला भेट देऊन ती माळ त्याच्या गळ्यात अडकवली.

राजाने नरसीजींची ही जी परीक्षा घेतली ती लोकांना आवडली नाही. ते राजाला नावे ठेवू लागले. त्यामुळे लवकरच त्याचे राज्य बुडाले. आपले जसे तुकाराम महाराज तसे हे गुजराती लोकांचे आवडते संत आहेत. त्यांची पदे गुजराती लोक मोठ्या भक्तिभावाने गातात.

☆ ☆

# नानक

पंजाबातील एका शाळेतील प्रसंग. गुरुजी प्रश्न विचारीत होते. मुले उत्तरे देत होती. इतक्यात एक मुलगा मध्येच उठून गुरुजींना सारखे प्रश्न विचारू लागला. ''देव आणि धर्म सारे थोतांड आहे. देव तरी एकच आहे ना? मग निरनिराळ्या धर्मांसाठी लोकांनी आपापसात का भांडावे? भांडणात काय सुख मिळते?'' गुरुजी रागावले आणि त्यांनी सारखे प्रश्न विचारणाऱ्या नानकाला वर्गाबाहेर हाकून दिले.

नानकाने शाळा सोडली. मुलगा काही शिकत नाही, याचे वडिलांना फार वाईट वाटले. ते रागावले आणि त्यांनी नानकाला गुरे सांभाळण्याचे काम सांगितले. नानक गुरे घेऊन रानात जाऊ लागला. पण त्याला याबद्दल वाईट वाटले. तो बेचैन झाला. तो रानातील आपला वेळ विचारात घालवू लागला. कशातच त्याचे लक्ष लागेना. गुरे सांभाळण्याचे

सोडून तो झाडाखाली विचार करीत बसे. वडिलांनी दिलेला खाऊ तो सर्व मुलांना वाटून टाकी. त्यामुळे त्याला घर सोडावे लागले. रानावनातून तो सुखाचा शोध करू लागला.



शेवटी त्याला पटले की, "माणसे इथून तिथून सारी एक! हिंदु, मुसलमान, बुद्ध, जैन वगैरे धर्मांचे भेद फुकट आहेत. आपसात कोणीही भांडू नये जातिभेद नसावेत. मूर्तिपूजा नसावी एकीने वागावे. नेकीतच सुख आहे. सारी माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. प्रत्येकाने माणूस धर्म पाळावा आणि गरिबांचे रक्षण करावे." असा उपदेश नानकाने सर्व लोकांना दिला.

नानकाने पुष्कळ प्रवास केला. एकदा नानक हरिद्वारला आला. रात्री त्याने धर्मशाळेत मुक्काम केला. सकाळी तो गंगेवर स्नानाला गेला. तेथे खूप लोक जमले होते. कोणी आंघोळ करीत होते कोणी धूणे धूत होते. कोणी पाण्यात उभे राहून देवाचा जप करीत होते. एक माणूस पूर्वेकडे तोंड करून उभा होता. हातांत पाणी घेऊन तो आपल्या पितरांना देत होता. ते पाहताच नानकाने विचारले, "तुम्ही

हे काय करीत आहात?"

"मी माझ्या पितरांना पाणी देत आहे," तो माणूस म्हणाला, "तुम्ही स्नान झाल्यावर नाही का पितृतर्पण करीत? तुम्ही नाही का तुमच्या पितरांना पाणी देत?"

"तुमचे वडील, आजोबा, कोठे आहेत?" नानकाने विचारले.

"ते वारले, स्वर्गाला गेले."

नानक नदीत उतरला. त्याने नदीत बुडी मारली. आंघोळ केली. अंग पुसले. मग नानकाने हातात एक भांडे घेतले. तो नदीच्या प्रवाहाजवळ जाई, भांडे भरून घेई आणि काठावर आणून ओती. ते पाहून मघाचा तो माणूस म्हणाला, "हे तुम्ही काय करीत आहात?"

"माझ्या शेतातील झाडांना पाणी देत आहे."

"तुमचे शेत कोठे आहे?"

"माझे शेत येथून काही मैल दूर आहे."

"येथून काही मैल दूर असलेल्या झाडांना पाणी कसे पोहोचणार?" त्या माणसाने विचारले.

"का नाही पोहचणार? अनंत मैल अंतरावर असलेल्या पितरांना तुम्ही येथून दिलेले पाणी जर पोहोचते, तर पंधरावीस मैलांवर असणाऱ्या माझ्या शेतातील झाडांना मी येथून दिलेले पाणी का नाही पोहोचणार?"

नानकाच्या उत्तराने सारे हसले. अशा तऱ्हेने नानक व्यवहारातील उदाहरणे देऊन लोकांच्या मनातील लोकभ्रम नाहीसे करी. आणि त्यांना उपदेश करी. पुष्कळ लोकांना त्याचा उपदेश पटला. ते त्याचे शिष्य झाले. शिष्य म्हणजे सिख्ख! शीख लोक नानकाच्या उपदेशाप्रमाणे वागू लागले. गुरु नानक हा शीख धर्माचा संस्थापक होय.

पुढे सर्व पंजाबभर शीख धर्म पसरला. त्यांच्या धर्मग्रंथास 'ग्रंथसाहेब' असे म्हणतात.

☆ ☆

# साध्वी मीराबाई



मीरा ही रतनसिंहजी राठोडांची एकुलती एक मुलगी होती. आपल्या या लाडक्या लेकीचा कोणताही हट्ट ते आनंदाने पुरवीत असे. एकदा रतनसिंहजींच्या घरी एक साधुपुरुष आला. त्याच्यापाशी श्रीकृष्णाची एक सुंदर मूर्ती होती. ती पाहिल्याबरोबर छोट्या मीराने ''आपल्याला ती मूर्ती पाहिजेच'' म्हणून हट्ट धरला. तिचा तो हट्ट पाहून तो साधू म्हणाला, ''बेटा ही घे माझी मूर्ती तुला. हिला मी गिरधरलाल म्हणतो. तू या गिरधरलालजीला कधीही विसरू नकोस.''

मीराने साधूचे म्हणणे एकदम मान्य केले. ती रोज गिरधरलालची पूजा अर्चा करू लागली. तिचा गळा फार गोड होता. गिरधरलालचे भजन ती करू लागली की, आजूबाजूचे सारे लोक आपली तहानभूक विसरत.

मीरा मोठी झाल्यावर तिचे लग्न मेवाडचा युवराज भोजराज याच्याबरोबर लावून देण्यात आले. सासरी जाताना आपल्या आवडत्या गिरधरलालजीला बरोबर घेण्यास मीरा मुळीच विसरली नाही. तिचे हे श्रीकृष्णभक्तीचे

वेड पाहून भोजराज प्रथम प्रथम तिला खूप रागे भरे. पण शेवटी त्याच्या लक्षात आले की, मीराचे श्रीकृष्णावर खरोखर प्रेम आहे. त्याची भक्ती केल्याशिवाय तिला एक क्षणभरही करमणार नाही. यानंतर तो तिला कधीही रागे भरला नाही. उलट ती भजन करू लागली की, भोजराज तिला साथ करू लागे.

पण भोजराजाची ही साथ मीराबाईला फार काळ लाभू शकली नाही. थोड्याच दिवसात भोजराज मरण पावला. मीरा विधवा झाली. पण या गोष्टीचे ती फार काळ दुःख करीत बसली नाही. उलट संसाराचा पाश मागे नसल्याने ती आता आपला सारा वेळ भजनपूजनात घालवू लागली.

मीराबाईचे हे वागणे तिचा दीर विक्रमजित याला पसंत पडेना. त्याने तिला "हे वेड सोडून देण्याविषयी परोपरीने सांगून पाहिले." पण मीराबाई आपला निश्चय सोडीना. शेवटी विक्रमजिताने तिला ठार मारण्यासाठी विषाचा एक पेला तिच्याकडे पाठवून दिला. मीराने देवावर विश्वास ठेवून ते विष घेतले. पण असे म्हणतात की, परमेश्वराने पेल्यातल्या विषाचे अमृत करून मीराबाईचे प्राण वाचविले.

मीराबाई मेली नाही असे पाहून राजाचा राग अनावर झाला. त्याने तिला मारण्यासाठी अनेक युक्त्या योजून पाहिल्या. पण दरवेळी परमेश्वर तिचे प्राण वाचवी. शेवटी मीराबाई स्वतःच्या छळाला कंटाळली व मेवाड सोडून तीर्थयात्रा करीत करीत द्वारकेला जाऊन राहिली. मीराबाई गेल्यापासून विक्रमजिताच्या राज्याला एकसारखी उतरती कळा लागली. त्यामुळे त्याला आपल्या वागण्याचा पश्चाताप होऊ लागला. तो स्वतः मीराबाईला आणण्यासाठी द्वारकेला गेला. पण मीराबाईने त्याला स्पष्ट सांगितले, "मी आता माझ्या स्वतःच्या घरी आले आहे. तेथून हलण्याची मला आता बिलकूल इच्छा नाही."

मीरा रात्रंदिवस भजन करी. तिने अनेक पदे रचली. तिची पदे रसाळ आहेत. मीराच्या भक्तीची कीर्ती साऱ्या राजस्थानात पसरली. मीराबाईला हे जग सोडून चारशे पेक्षा जास्त वर्षे झाली पण 'मीरा के प्रभु गिरधर नागर' हे तिच्या पदात शेवटी येणारे गोड शब्द आपल्या कानांत घुमत राहातात.

# बाबर



शिक्रीची लढाई चालू होती. तोफांच्या धुमधडाक्यात सारे सैन्य गडबडून गेले होते. राजा बाबर आणि राजपूत राजा राणासंग यांची लढाई चालू होती.

बाबर हिंदुस्थानात आला. पठाण आणि राजपूत यांच्या भांडणाचा तिसऱ्याने फायदा करून घेतला. पाहुणा आला आणि तोच घरमालक झाला. तसे बाबराने केले. ही गोष्ट राजपूत लोकांना सहन झाली नाही. राजपूत लोक मोठे शूर आणि अभिमानी होते. त्यांनी एकत्र येऊन बाबराशी लढाई सुरू केली.

बाबरही मोठा निश्चयी होता. काबूलचे राज्य घेतल्यानंतर तो हिंदुस्थानात आला. पानिपतच्या पहिल्या युद्धात त्याने दिल्ली बळकाविली. दिल्लीचे वैभव पाहून त्याचे मन रमले. राणासंग चाल करून आला. त्याच्याशी बाबरची शिक्री येथे लढाई झाली.

पण राजपूतांच्या शौर्यापुढे बाबराचे सैन्य टिकाव धरीना. मोगल सैन्य पाठीला पाय लावून पळू लागले. बाबर घाबरला पण त्याने

धीर सोडला नाही. पळून आलेल्या सैनिकांना एकत्र जमवून त्याने धीर दिला आणि तो त्यांना म्हणाला, "घाबरू नका! मर्द हो, हे धर्मयुद्ध आहे. मरण केव्हातरी येणारच! लढता लढता मरणेच चांगले. मी फार पापी आहे. आत्तापर्यंत निरनिराळी राज्ये घेण्यासाठी मी पुष्कळ लोक लढाईत मारले, पण आजची लढाई राज्य घेण्यासाठी नाही. धर्मासाठी आहे. वीर हो, आपणास ज्या वाईट सवयी आहेत, त्या त्या सोडण्याचा निश्चय करू या. अल्लाची शपथ घेऊन आजपासून आपण आपल्या वाईट सवयी सोडून देऊ आणि चांगले वागण्याचे ठरवू. मी कुराणावर हात ठेवून अशी शपथ घेतो की, यापुढे मी दारू पिणार नाही. खात्रीने आता मी विजयी होईन. हिम्मत मर्दा तो मदद खुदा."

दारुची भांडी फटाफट फुटली. पेले दूर भिरकावले गेले. दारूचे पाट जमिनीवरून वाहू लागले. सैन्यात नवा उत्साह आला. कुराणाची शपथ घेऊन प्रत्येकाने मरेपर्यंत लढण्याची प्रतिज्ञा केली.

यामुळे घनघोर लढाई झाली. राणासंगाचा पराभव झाला. बाबर विजयी झाला. नंतर शिक्रीचे नाव त्याने फत्तेपूर असे ठेविले. हजारो दारुड्यांना एका क्षणात दारूपासून अलिप्त करण्याचा मान फत्तेपूर शिक्री या गावाला मिळाला.

☆ ☆

# हिमू

हिमू हा दिल्लीचा एका हिंदू व्यापाऱ्याचा मुलगा होता. तो मोठा हुशार व कर्तबगार होता. दिल्लीच्या बादशाहापाशी त्याचे फार वजन होते. बादशाहाने हिमूला दरबारात अधिकाराची जागा दिली. आपल्या अंगच्या हुशारीने आणि कर्तबगारीने हिमू लौकरच आदिलशहा सूरशहाचा प्रधान बनला.

हिमू हिंदू होता. त्यामुळे त्याची प्रधानकी पुष्कळशा मुसलमान सरदारांना खपेना. ते त्याचा द्वेष करू लागले. पण बादशाहाची हिमूवर पक्की मर्जी होती. शेवटी अनेक सरदारांनी बादशाहासह हिमूला ठार मारून

दिल्लीची गादी परत हुमायून या मोगल बादशाहाला देण्याचे ठरविले. या कटाचा सुगावा लागताच हिमू आणि सूरशहा गुप्तपणे दिल्लीतून पळून गेले. सरदारांना आनंद झाला. त्यांनी हुमायून बादशाहास परत दिल्लीच्या गादीवर बसविले.

हिमूने बंगालमध्ये सैन्य आणि सामुग्री जमविली. त्याने दिल्लीवर चाल करून जाण्याचे ठरविले. त्याच्या नशिबाने त्याला आयतीच संधी लाभली. हुमायून बादशाहा जिन्यावरून पडून मरण पावला. दिल्ली मोकळी पडली. हुमायूनाचा मुलगा अकबर हा लहान असून लाहोर येथे होता. हिमूने दिल्लीवर स्वारी केली. या लढाईत सूरशहा मरण पावला.



विक्रमादित्य - म्हणजे पराक्रमाचा सूर्य असे नाव धारण करून हिमू दिल्लीच्या गादीवर बसला. दिल्लीचा राजदरबार हिंदूपद्धतीने चालू लागला. अंत:पुरातील गोषा उडाला. तुलसीवृंदावने ठिकठिकाणी दिसू लागली. कुराणाऐवजी पुराण सुरू झाले. मंदिरे, उद्याने आणि गोपुरे वैभवाने शोभू लागली.

पण थोड्याच दिवसात अकबराने त्याचा सूड उगवला. बहरामखानच्या मदतीने त्याने पुन्हा दिल्लीवर चाल केली. पानपत येथे दुसरे महायुद्ध सुरू झाले. हिमू मारला गेला आणि दिल्ली पुन्हा मोगलांच्या ताब्यात गेली.

☆ ☆

# महाराणा प्रताप



अकबर बादशाहाने बहुतेक राजपूत राजांना जिंकले. कित्येकांना मोठ्या नोकऱ्या दिल्या. जयपूरचा राजा मानसिंग याच्या बहिणीशी त्याने स्वत: लग्न केले. मोगल राजपुत्र आणि राजपूत राजकन्या यांच्या विवाहास त्याने उत्तेजन दिले. ही शरण जाण्याची वृत्ती चितोडच्या राजपूत घराण्यास पसंत नव्हती. तेथील महाराणा प्रताप हा फार स्वाभिमानी होता. आपले राज्य गेले तरी चालेल, पण आपण मोगलांची ताबेदारी पत्करणार

नाही, असा त्याचा निश्चय होता. मोगलसेनेशी त्याचा सतत झगडा चालू असे. हळदी घाटात एक जंगी लढाई झाली. मोगल सेना खूप मोठी आणि महाराणा प्रतापचे लोक थोडे होते. महाराणा प्रताप शौर्याने लढला. पण त्यात त्याचा पराभव झाला.

यानंतर राणा आपल्या एकनिष्ठ सेवकानीशी अरवली पर्वताच्या जंगलात राहू लागला. त्याने गनिमीकाव्याने मोगलांना त्रास द्यावयाचे ठरविले. पण त्यामुळे राहावयाला घर नाही, कधी कधी तर खायला अन्न नाही अशा विपत्तीत तो पडला. आज येथे तर उद्या तिथे असे त्याला भटकावे लागे.

अशा काळातही त्याला साहाय्य करणारे काही राजपूत होते. महाराणा प्रतापचा एक जुना प्रधान होता त्याचे नाव भामशाह. माळवा प्रांतात हल्ले करून त्याने लाखो रुपये मिळविले. धडपड करून तो रानात गेला आणि महाराणाला भेटला.

महाराणा म्हणाला, ‘‘या, या, भामशाहा! इकडे कोठे आलात?’’

भामशाह म्हणाला, ‘‘आपले दर्शन घेण्यासाठी.’’

महाराणा म्हणाला, ‘‘मी आता महाराणा नाही. स्वातंत्र्यासाठी भटकणारा भिकारी आहे!’’

भामशाह म्हणाला, ‘‘महाराणा, असे का म्हणता? आम्ही तुमचेच अन्न खात आहोत. माझ्याजवळ खूप धन आहे. हे सर्व मी आपल्याला देण्यासाठी येथे आलो आहे.’’

राणाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, ‘‘प्रधानजी, यामुळे तुमची माझ्यासारखी कठिण स्थिती होईल.’’

भामशाह म्हणाला, ‘‘नाही, महाराज! तुम्ही या द्रव्याच्या जोरावर सैन्य निर्माण कराल आणि पुन्हा आपली मेवाडभूमी स्वतंत्र कराल, अशी माझी खात्री आहे.’’

प्रधानजींच्या या शब्दांनी महाराणा प्रतापला उत्साह आला. याच वेळी अकबराचे सैन्य सरहद्द प्रांतात गुंतले होते. महाराणा प्रतापने सैन्य जमविले. दारूगोळा मिळविला. हळूहळू आपला प्रांत परत जिंकला. चितोड तेवढे त्याला घेता आले नाही. धन्य तो प्रधान भामशाह आणि धन्य त्याचा स्वामी राणा प्रताप!

महाराणा प्रताप आता म्हातारा झाला होता. त्याने सरदारांकडून शपथ घेवविली की, "आम्ही मोग़लांचे स्वामित्व कधीही मान्य करणार नाही."

यानंतर लवकरच महाराणा प्रताप मरण पावला.

☆ ☆

# एकनाथ महाराज

**चा**रशे वर्षे झाली या गोष्टीला. पैठणला एकनाथ नावाचे साधू राहात होते. एकनाथांच्या घरची स्थिती चांगली होती. ते खाऊन पिऊन सुखी होते. एकनाथ आपला वेळ स्नान, देवपूजा आणि पुराण सांगणे यात घालवीत. त्यांचे भागवतावरील पुराण ऐकण्यास सर्व जातीचे लोक जमत. ब्राह्मण, मराठे, माळी, महार यांना एकनाथांचे सांगणे पटे. एकनाथ पुराणातून सांगत, "सगळी माणसे देवाची लेकरे आहेत. देवाजवळ ब्राह्मण मोठा आणि महार खोटा असे काही नाही, सगळ्यांशी प्रेमाने वागावे म्हणजे देवाला आवडते."

एकदा एकनाथ महाराज काशीहून रामेश्वरला जात होते. त्यांनी आपल्याबरोबर गंगेची कावड घेतली होती. रामेश्वरला जायचे आणि तेथील रामेश्वर महादेवाला बरोबर घेतलेल्या गंगेच्या पाण्याने स्नान घालायचे असे त्यांनी ठरवले होते. नाथांचा प्रवास चालू होता. उन्हाळ्याचे दिवस होते. रस्त्याच्या कडेला एक गाढव पाण्यावाचून तडफडत होते. ते अतिशय तहानेले होते. नाथांचे लक्ष त्या गाढवाकडे गेले. त्यांनी आपल्याजवळचे गंगेचे पाणी गाढवाला पाजले आणि त्याचा जीव वाचविला.

उन्हाळ्याचे दिवस होते. एकनाथ नदीवर दुपारचे आंघोळीला गेले. नदीच्या तापलेल्या वाळूत एकनाथांचे पाय चटचट पोळत होते. नाथांनी आंघोळ केली धोतर धुतले. धोतराचा पिळा खांद्यावर टाकला. एका हातात पाण्याने भरलेला गडवा घेतला आणि नाथ झपझप घराकडे येऊ लागले. इतक्यात तापलेल्या वाळूत एक लहान मूल रडत आहे असे त्यांना दिसले. ते मूल एका महाराचे होते आणि ते आईपासून

चुकून दूर आले होते. नाथांनी थोडासुद्धा विचार केला नाही. त्यांनी ताबडतोब त्या मुलाला कडेवर घेतले आणि त्याचे रडे थांबवून त्याला महारवाड्यात त्याच्या आईपाशी नेऊन दिले!

सगळ्या महारांनी तोंडात बोट घातले! महारांना फार नवल वाटले!

श्राद्धाच्या दिवशी एकदा तर त्यांनी रस्त्याने जाणाऱ्या हरिजनांना घरात बोलावून पोटभर जेऊ घातले.

एकनाथांचा मोठेपणा महारांना कळून आला. एकनाथ फक्त पुराणाच्या वेळी उपदेश करीत नाहीत, तर स्वत: तसे वागतात. याबद्दल सर्व लोकांना नवल वाटले आणि नाथांचा 'देवमाणूस' असा लौकिक झाला. रोज नाथांच्या पुराणाला गर्दी होऊ लागली. लोक म्हणू लागले, ''देव नाथांच्या घरी कावडीने पाणी भरतो आणि नाथांना पुराण सांगायला मोकळीक देतो.''

☆ ☆

# चांदबिबी

अहमदनगर येथे निजामशाही घराण्याचे राज्य होते. ते राज्य जिंकावे अशी दिल्लीच्या अकबर बादशाहाची इच्छा होती. म्हणून अकबराने आपला मुलगा मुराद यास सैन्य देऊन नगरवर पाठविले. मजल दरमजल करीत काही दिवसांनी मुराद नगरजवळ आला. त्याने किल्ल्याच्या भोवती वेढा दिला. सुरुंग लावून मोगलांनी तटास खिंडार पाडले. अहमदनगरच्या शिपायांचा धीर सुटला व ते पळू लागले.

यावेळी एका स्त्रीने नगरचे राज्य वाचविले. तिचे नाव चांदबिबी तिने अंगावर चिलखत घातले हातात तलवार घेतली आणि ती खिंडारापाशी आली. ती सैनिकांना म्हणाली, ''अरे, असे पळता काय? तुम्ही मीठ खाता त्याला संकट काळी सोडून जाता? मी बाई माणूस असून येथे उभी आहे.'' पळणाऱ्या शिपायांना लाज वाटली. आणि तिच्या शब्दाने धीरही आला. खिंडारापाशी खूप लढाई झाली. रात्र झाल्याने मोगल सैन्य आपल्या तंबूत परतले.

चांदबिबीने हे ओळखले की ही वेळ वाया घालवून चालायचे नाही. तिने सैनिकांना आणि गवंड्यांना कामाला बोलाविले आणि एका रात्रीत ते खिंडार बुजविले. या प्रसंगावधानाने फौजेलाही विश्वास वाटू लागला.

दुसऱ्या दिवशी मोगल सैनिक तटाजवळ आले. त्यांनी तट बांधलेला पाहिला, अशा कर्तव्यनिष्ठ फौजेवर जय मिळवणे कठिण, असे मुरादला वाटले. त्याने चांदबिबीशी तहाचे बोलणे सुरू केले. चांदबिबीजवळही मोठी सेना नव्हती, म्हणून तिने थोडा मुलूख देऊन मोगलांशी तह केला.

निजामशाही घराण्यात गादीबद्दल तंटे होते. ती विजापूरच्या राजपुत्राची पत्नी होती, पण तो वारल्याने ती आपल्या माहेरी अहमदनगरला आलेली होती. आपल्या पराक्रमाने तिने माहेरचे राज्य वाचविले. पण नगरचे दुर्दैव! तिच्याविरुद्ध सरदारांनी कारस्थान केली आणि काही वर्षांनी त्यांनी तिला ठार मारले.

☆ ☆

# अकबर

दिल्लीला अनेक मोगल बादशाहा होऊन गेले. त्यात अकबर सर्वांत थोर होय. याचा जन्म झाला तेव्हां त्याचा बाप हुमायून याने जीव वाचविण्यासाठी दिल्ली सोडून पळ काढला होता. या संकटकाळात सिंध प्रांतात उमरकोट येथे अकबराचा जन्म झाला. त्या पडत्या स्थितीतही हुमायुनाजवळ कस्तुरी होती. जवळ असलेल्या साथीदारांना ती देऊन तो म्हणाला, ''या कस्तुरीच्या सुवासाप्रमाणे या मुलाची कीर्ती जगभर पसरो.'' हे बोलणे पुढे खरे ठरले.

काही वर्षांनी हुमायुनाने परत दिल्लीचे राज्य जिंकले. त्यानंतर तो लवकरच मरण पावला. या वेळी अकबर लहान होता. बहरामखान नावाचा म्हातारा सरदार त्याला राज्यकारभारात मदत करी. अकबर मोठा झाला तरी बहरामखानच कारभार पाहात असे. तेव्हा अकबराने

एक युक्ती योजिली. एक दिवस शिकारीस जाण्याचे निमित्त करून तो एकटा आग्रा शहरापर्यंत गेला. तेथून त्याने बहरामखानाला कळविले की, "राज्याचा करभार मी पाहणार आहे. तुम्ही मक्केच्या यात्रेला निघून जा." बहरामखानाने थोडी गडबड केली, पण शेवटी त्याने अकबराची आज्ञा मान्य केली. त्यामुळे इतर सरदारांवर अकबराची छाप पडली.



निश्चय करून त्याची लगेच अंमलबजावणी करण्यात अकबर कुशल होता. एकदा गुजराथेत बंड झाल्याचे त्यास कळले. ते मोडण्यासाठी काही सेना त्याने पाठविली. याशिवाय तीनशे निवडक लोक बरोबर घेतले आणि तो स्वत:च घोड्यावर बसून निघाला. आग्रा येथून अहमदाबाद सहाशे मैल आहे. ते दिवस उन्हाळ्याचे होते आणि राजपुतान्यातील रखरखीत भागातून त्याला जावे लागले. तरीसुद्धा अकरा दिवसांत तो अहमदाबादला पोहोचला. त्याने शत्रूवर लगेच हल्ला केला. त्याची तडफ पाहूनच बंडवाले घाबरून गेले. अकबराने त्यांचा मोड केला. बंडवाल्यांना वाटले होते की, दिल्लीहून सैन्य येण्यास दोन तीन महिने

सहज लागतील.

अकबर उदार आणि चतुर होता. राजपुतांशी लढताना त्याच्या लक्षात आले की, हे लोक शूर आहेत. त्याने त्यांना अधिकाराच्या जागा दिल्या आणि त्यांच्याशी मैत्री केली. हिंदु लोकांवरील 'जिझिया' नावाचा कर त्याने रद्द केला. यामुळे हिंदूंत त्याच्याबद्दल प्रेम निर्माण झाले. त्यांनी अकबराचे साम्राज्य वाढविण्यास खूप मेहनत घेतली. यापैकी राजा मानसिंह हा प्रमुख होय.

हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी या सर्व वर्गांच्या पंडितांशी तो मोकळेपणाने चर्चा करी. त्यासाठी त्याने फत्तेपूर-शिक्री येथील राजवाड्यात एक दिवाणखाना राखून ठेवला होता. दर शुक्रवारी तेथे धर्मचर्चा होत असे. या कामी अबुलफजल नावाच्या मंत्र्याचा त्यास उपयोग झाला. याखेरीज राजा तोरडमल, बदाउनी, बिरबल असे त्याचे कारभारी होते. पृथ्वीवरील थोर राजकर्त्यांमध्ये अकबराची गणना करतात.

☆ ☆

# शहाजहान

**स**र्व फुलांत चांगले फूल कोणते? सर्वांत पवित्र नदी कोणती? सर्वात सुंदर इमारत कोणती? या प्रश्नांची तुम्ही काय उत्तरे द्याल? कोणी म्हणेल सोनचाफ्याचे फूल चांगले तर कोणी म्हणेल गुलाबाचे फूल उत्तम. तसेच नदीचे आहे. काही सांगतील की, गंगा नदी पवित्र, तर कोणी सांगतील कृष्णा नदी पवित्र. पण इमारतीच्या प्रश्नाचे उत्तर सर्वजण एकच देतील. ते म्हणतील, ''सर्वांत सुंदर इमारत म्हणजे आग्रा येथील ताजमहाल होय.''

ईश्वराने फुले, नद्या, डोंगर निर्माण केले. पण ताजमहाल माणसांनी बांधला. यमुना नदीच्या काठी ही इमारत आहे. ही इमारत बांधण्यास बारा वर्षे लागली. वीस हजार लोक रोज तेथे काम करीत या इमारतीच्या भिंतींना पांढऱ्या रंगाचे संगमरवरी दगड वापरले आहेत. फरसबंदीला हेच दगड आहेत. या भिंतीत कोंदणे करून रत्नेही बसविली होती. या मुख्य इमारतीच्या चार बाजूंना उंच मनोरे आहेत. त्यांची

उंची सव्वाशे फुटांपेक्षा जास्त आहे. रात्री चांदण्यात ही दगडाची इमारत फारच सुंदर दिसते.



शहाजहान बादशाहाने ही इमारत बांधविली. त्याच्या पत्नीचे नाव मुमताज. तिचे थडगे या इमारतीत आहे. शहाजहानच्या मृत्यूनंतर त्यासही येथेच दफन करण्यात आले. शहाजहान हा अकबर बादशहाचा नातू होय. त्याच्या कारकीर्दीत मोगलांचे राज्य वैभवास चढले. त्याला कला-कौशल्याची फार आवड होती. लाल किल्ला, दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास या प्रसिद्ध इमारती त्यानेच बांधविल्या. सहा सात कोटी रुपये किंमतीचे सिंहासन त्याने तयार करविले. होते. त्याला मयूर सिंहासन म्हणतात.

दुर्दैवाने त्याचाच मुलगा औरंगजेब याने म्हाताऱ्या शहाजहानला कैदेत टाकले. आठ वर्षे आग्ऱ्याच्या किल्यात तो बंदी म्हणून होता. तेथून त्याला ताजमहाल दिसत असे. या 'ताज' कडे पाहात पाहातच त्याने प्राण सोडला.

☆ ☆

# तुकाराम महाराज



पुण्याजवळ देहू गावात तुकाराम नावाचे साधु पुरुष राहात होते. ते नेहमी विठ्ठलाचे भजन करीत असत. भजन, पूजन आणि कीर्तन यातच त्यांचा सगळा वेळ जाई. संसाराकडे त्यांचे लक्षच नव्हते.

तुकारामाची बायको जिजाऊ मोठी खंबीर बाई. ती घरदाराची नीट व्यवस्था ठेवावी. मुलाबाळांचे संगोपन करावे आणि आपल्या नवऱ्याला वेळेवर खाऊपिऊ घालावे म्हणून तिची सारखी धडपड चालायची.

पण घरात फारच गरीबी असायची. त्यामुळे या कुटुंबाचे फार हाल होत असत. तुकारामाचे लक्ष सदा भजनाकडे. घराकडे कोण पाहणार! घरात अन्न नाही, कपडा नाही, भांडी नाहीत, की काहीच नाही. कसेतरी दिवस निघून जात.

तुकारामाच्या या भजनवेडामुळे जिजाऊ त्यांना खूप रागावून बोले पण तुकाराम तिला शांतपणे म्हणत, "आवडे, अग पांडुरंग जसे ठेवील तसे आपण राहावे. सगळ्या जगाची चिंता त्याला आहे. सगळा स्वार्थ सोडून आपण त्याचे भजन करावे. रागाचे बोलणे सोडून द्यावे."

या बोलण्यामुळे जिजाऊ गप्प राहायची.

एकदा शिवाजीमहाराजांनी तुकाराम महाराजांकडे सोन्या हिऱ्याचे दागदागिने पाठविले. भरजरी कपडे आणि भरपूर द्रव्य पाठविले. भेटीची ताटे घेऊन शिवाजीचे शिपाई तुकारामाच्या घरी आले.

त्यावेळी तुकाराम महाराज घरी नव्हते. भंडाऱ्याच्या डोंगरावर जाऊन भजन करीत बसले होते. जिजाऊने शिवाजीचा तो नजराणा घेतला. काशी आणि महाद्या या मुलांनी तो नजराणा पाहिला. त्या सर्वांना अतिशय आनंद झाला.

कधीही न पाहिलेले ते भारी दागदागिने, कपडे त्या तिघांनी भराभर उचलून अंगावर घातले. वाहवा किती छान दिसतात! केवढा थाट! किती ऐट! खूप मजा चालली त्यांची. पण-

तितक्यात तुकाराम महाराज घरात आले. त्यांनी तो देखावा पाहिला. ते म्हणाले, "आवडे, अगं हा मातीचा मळ अंगावर कशाला. मन निर्मळ असले म्हणजे पुरे!" नंतर त्यांनी ते सर्व दागदागिने आणि कपडे शिवाजी महाराजांकडे परत पाठवून दिले. सोबत निरोप दिला की, "सोने नाणे आम्हां मृत्तिकेसमान-"

तुकाराम फार शांत वृत्तीचे होते. उसाच्या मळेवाल्याने त्यांना एकदा पुष्कळ ऊस दिले. रस्त्याने जाताना काही मुले त्यांना म्हणाली, "बुवा आम्हांला द्या ना ऊस." तुकारामांनी ऊस वाटून टाकले. ऊसाचा एक तुकडा उरला, तेवढाच ते घरी घेऊन गेले. त्यांच्या पत्नीला ही बातमी आधीच समजली होती. तिला तुकोबांचा राग आला. तिने तो ऊस घेतला आणि नवऱ्याच्या पाठीत मारला. ऊसाचे दोन तुकडे झाले! ते त्यांनी आपल्या दोन मुलांना दिले, त्यांना राग आला नाही.

तुकाराम विठ्ठलभक्त होते. ते कीर्तन करीत. राजा शिवाजी लहानपणी त्यांच्या कथा ऐकावयास जाई. असे सांगतात की, त्यांना पकडण्यासाठी विजापूरच्या सरदार तुकारामाच्या कीर्तनाला गेला. तुकारामांनी विठोबांचा धावा केला आणि भजन चालू ठेवले. तो काय आश्चर्य! मुसलमान सैनिकांना तेथे असलेले सर्व श्रोते शिवाजीसारखे दिसू लागले. ते गोंधळून गेले. या गडबडीत खरा शिवाजी केंव्हाच निसटून गेला.

ब्राह्मणांपासून महारांपर्यंत सर्व लोक तुकाराममहाराजांच्या भजनी लागले याचा राग मंबाजीबुवांना आला. त्यांनी तुकाराम महाराजांना त्यांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत बुडवायला सांगितल्या. त्यांच्या सांगण्याप्रमाणे तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणी नदीच्या डोहात बुडविल्या; पण त्याचे त्यांना फार दु:ख झाले. ते इंद्रायणी तीरी देवाचा धावा करीत उपाशीच बसून राहिले. शेवटी अभंगाच्या वह्या नदीतून जशाच्यातशा वर तरंगल्या. या प्रसंगाने लोक तुकाराम महाराजांकडे अधिकच ओढले गेले.

तुकाराम बुवांची ईश्वरावर श्रद्धा होती. ते म्हणत, ‘‘देव कृपाळू आहे. त्याचे भजन करावे म्हणजे मनुष्याला समाधान प्राप्त होते.’’ त्यांनी अभंग रचून त्यात हे विचार मांडले आहेत. त्यांच्या अभंगाची शेवटची ओळ ‘‘तुका म्हणे -’’ अशी असते. महाराष्ट्रात हे अभंग कोठेही ऐकावयास मिळतात, इतके ते लोकप्रिय झालेले आहेत.

☆ ☆

# गुरू गोविंदसिंह

मराठावाड्यात नांदेड येथे शीखांचे प्रसिद्ध धर्ममंदिर आहे. याच ठिकाणी शिखांचा दहावा आणि शेवटचा गुरू ‘गोविंदसिंह’ याची समाधी आहे. त्यानेच शीख लोकांना लढाऊ वृत्तीचे बनविले.

याला कारणही तसेच घडले. दिल्लीचा बादशहा औरंगजेब याने गोविंदसिंहाच्या पित्याला फार छळले आणि त्याचा वध केला. त्यानंतर पंधरा वर्षांचा गोविंदसिंह शिखांचा गुरू झाला. काही वर्षे गुप्त राहून त्याने हिंदी, संस्कृत, फारसी या भाषांचा अभ्यास केला. प्रकट झाल्यावर पुन: औरंगजेबाशी त्याचा तंटा सुरू झाला. कारण औरंगजेबाला वाटे की, शिखांनी त्यांचा धर्म सोडावा आणि मुसलमान व्हावे.

गोविंदसिंहांच्या उपदेशाने शिखांत स्वधर्मप्रेम उत्पन्न झाले. त्याने शिष्यांची परीक्षा पाहाण्यासाठी एक विलक्षण युक्ती केली. हजारो शिष्य जमले असता त्याने त्यांना विचारले, ‘‘ही पहा माझी तलवार. देवतेला या

तलवारीने बळी देण्यासाठी शिष्य पाहिजे. आहे का कोणी तयार?"

सरदार, व्यापारी, शेतकरी असे लोक या सभेमध्ये होते. हा प्रश्न ऐकून जिकडे तिकडे शांतता पसरली. एक वीर पुरुष उठला. त्याला घेऊन गोविंदसिंह वधस्थानी गेला आणि रक्ताने माखलेली तलवार घेऊन तो एकटाच पुन्हा सभेत आला. पुन्हा त्यांने तोच प्रश्न केला. पुन्हा एक वीर त्याच्या मागोमाग गेला. असे पाच वेळा झाले. परत येताना त्याने पाचही जणांना बरोबर आणले. नंतर तो सभेस म्हणाला, "मी तुमची निष्ठा पाहिली. मी पाच बकरे मारले. हे पाच वीर पुरुष आहेत. हे परीक्षेत पास झाले आहेत." श्रोत्यांना आनंद झाला. ते एकदम उद्गारले, "सत् श्री अकाल!"



औरंगजेबाशी झुंज देता देता गुरूचे दोन मुलगे मेले, आणि दोन मुलांना मोगलांनी भिंतीत चिणले! अनेक शिष्यही समरंगणात पडले, म्हणून गोविंदसिंहास दक्षिणेस यावे लागले.

तेथेही त्यास स्वस्थता लाभली नाही. त्याच्या मुसलमान शिष्यांपैकी एकाने तो शांत झोपला असता त्याच्या छातीत सुरा खुपसला. त्यातही

जागा होऊन धैर्याने गोविंदसिंहाने खुनीचा बळी घेतला. पण त्याची स्वत:ची जखम खोल असल्याने तो लवकरच मरण पावला. त्याने शिष्यांना सांगितले, "आता नवीन गुरू करू नका. ग्रंथसाहेब हाच आपला गुरू. धर्मासाठी प्राणपणाने लढा."

☆ ☆

# हैदर

हैदर हा प्रथम एक शिपाई म्हणून म्हैसूरच्या राजाच्या सैन्यात दाखल झाला होता परंतु आपल्या पराक्रमाने त्याने राजाला खूष करून तो तेथील मुख्य प्रधान झाला आणि शेवटी कावेबाजपणाने त्या राजाला ताब्यात घेऊन म्हैसूरचे राज्य त्याने पटकावले.

हैदरची बुद्धीमत्ता तीक्ष्ण आणि स्मरणशक्ती चांगली होती. तो शतावधानी होता. म्हणजे एकाच वेळी अनेक कामात तो लक्ष घालू शके. रोज सकाळी चौकात तो हातपाय आणि तोंड धूत असे. या वेळी त्याच्या बाजूस अनेक दूत उभे राहतात आणि ते गेल्या चोवीस तासात आपण आणलेली माहिती त्याला सांगत. ते सर्व एकाच वेळी बोलत असत आणि हैदरचे त्या सगळ्यांकडे लक्ष असे. कोठे शंका आली किंवा जास्त माहिती पाहिजे असली म्हणजे तो त्या त्या जासुदांना प्रश्नही विचारीत असे. कोणत्या भागातील दूत बोलतो आहे, हे तो त्याच्या आवाजावरून ओळखीत असे.

याचप्रमाणे सरकारी कचेरीतही त्याचे तसेच काम चाले. एकाच वेळी तो एकाला प्रश्न विचारीत असे दुसऱ्याला उत्तरे लिहिण्यास सांगत असे आणि आलेल्या पत्रांचे वाचनही त्याचे मुन्शी करीत ते तो ऐकत असे. त्याच वेळी महत्त्वाच्या प्रश्नांवर मंत्र्यांशी त्याची चर्चा चाले. तीस-चाळीस कारकुनांना पुरेल इतके काम तो त्यांना एकटा पुरवीत असे.

हैदर शक्य ते करून निरनिराळ्या धर्मातील लोकांचे तंटे टाळी. या तंट्यांना तो उत्तेजन तर कधीच देत नसे. एकदा असा प्रसंग

आला की, त्याच्या राज्यात मुसलमानातील शिया आणि सुनी या दोन पंथाच्या लोकांत तंटा सुरू झाला. भांडण इतके विकोपास गेले की दोन्ही पक्षांची लढाई होण्याचा रंग दिसू लागला. हे हैदरला कळताच त्याने दोन्ही बाजूंच्या पुढाऱ्यांना बोलावून घेऊन त्यांना तो म्हणाला, "हा काय मूर्खपणा करीत आहा? कुत्र्यांसारखे तुम्ही एकमेकांवर का भुंकता?" दोघांनी आपले म्हणणे त्याला सांगितले. तेव्हा त्याच्या लक्षात आले की महंमद पैगंबराच्या नंतरच्या अधिकाऱ्यांच्या बद्दल दोन पक्षांची विचारसरणी निराळी आहे; त्यामुळे तंटा सुरू झाला. मग हैदर त्यांना म्हणाला, "ज्यांच्यासंबंधी तुम्ही भांडत आहात ते जिवंत आहेत काय?"

लोक म्हणाले, "नाहीत."

हैदर म्हणाला, "जे लोक जिवंत नाहीत त्यांच्याबद्दल तंटा करणे मूर्खपणा होय. तुम्ही जर पुन्हा या कामी सरकारचा वेळ घेतलात तर याद राखा. सगळ्यांच्याच चिंधड्या उडवीन." असे म्हणून त्याने सर्वांना घालवून दिले.

त्याच्या धाकात त्याचे सर्व सैन्य असे. त्याने इंग्रजांना हिंदुस्थानातून घालविण्याचा यत्न केला पण तो फसला. तो इ. सन १७८२ मध्ये अर्काट येथे मरण पावला.

☆ ☆

# शिवाजी महाराज

स्वराज्य मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांना रात्रंदिवस शत्रूंशी झगडावे लागले. त्यांनी आपले मन व शरीर खंबीर बनविले होते. ते कधी निराश झाले नाहीत. कारण त्यांची आई जिजाई हिने त्यांना लहानपणापासून चांगली शिकवण दिली होती. तिने त्यांना श्रीरामचंद्र आणि अर्जुन यांच्या गोष्टी सांगितल्या होत्या आणि शेवटी सत्याचा विजय होतो असेही पटविले होते.

शिवाजी महाराज लहान होते तेव्हापासून त्यांचा स्वधर्माभिमान दिसून

येई. त्यांचे वडील शहाजीमहाराज हे विजापूरच्या बादशाहाचे सरदार होते. त्यांच्याबरोबर एकदा शिवाजीही विजापूरास गेले होते. एक दिवस बाल शिवाजी रस्त्याने चालले होते. त्यांना दिसले की, काही मुसलमान भर रस्त्यात गाईचा वध करीत आहेत. शिवाजी महाराजांनी त्यांना दरडावून विचारले, "तुम्ही का गाय कापता! आम्हां हिंदूची ती देवता आहे." एका खानाने उत्तर दिले, "तुम कौन पुछनेवाले हो! आम्ही मारणारच." लगेच शिवाजी महाराजांनी त्याचा हात धरला. थोडी दंगल झाली आणि गाईचा जीव वाचला. मुलाच्या अशा वागणुकीमुळे, काळजीमुळे शहाजीराजांनी त्यांना ताबडतोब पुण्यासच परत पाठविले.



शिवाजी महाराज जसे अभिमानी होते तसेच युक्तिवानही होते. ते एकदा आग्र्यास बादशाहाला भेटण्यासाठी गेले होते. ताजमहाल बांधणाऱ्या शहाजहानचा मुलगा औरंगजेब हा या वेळी बादशाहा होता. या बादशाहाने शिवाजी महाराजांना फसविले आणि त्याच्या हवेलीतच त्यांना कैदेत ठेवले. पण शिवाजी डगमगले नाहीत. आपण आजारी आहोत असे त्यांनी सोंग केले. आपणास बरे वाटावे म्हणून त्यांनी साधू, संत,

फकीर यांना मेवामिठाई पाठविण्यास सुरुवात केली. मोठेमोठे पेटारे रोज त्याच्या हवेलीतून ते बाहेर पाठवीत. पुढे पुढे पहारेकरी पेटारे तपाशीतनासे झाले. तेव्हा शिवाजी महाराजांनी एके दिवशी स्वत:सच एका पेटाऱ्यात कोंडून घेतले. त्यांचा मुलगा संभाजीही तेथे होता. त्यालाही निराळ्या पेटाऱ्यात ठेवले. नंतर ते पेटारे बाहेर नेण्यात आले. या वेळी पहारेकऱ्यांना शंका आली नाही आणि शिवाजी महाराज सुखरूप मथुरेस गेले. तेथून बैराग्याचा वेष घेऊन हिंडत हिंडत काही महिन्यांनी ते महाराष्ट्रात येऊन पोहोचले. लोकांना आनंद झाला. ते म्हणू लागले, "शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची खूप फजिती केली."

स्वराज्य स्थापल्यानंतर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकाचा समारंभ रायगडावर झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापलेले हे राज्य पुढे दीडशे वर्षे टिकले.

☆ ☆

# बाजी प्रभू

शिवाजी महाराजांनी अफझुलखानास ठार मारले. त्यांनी पुष्कळ सैन्य जमविले. त्यांनी पुष्कळ किल्ले आपल्या ताब्यात घेतले. कोल्हापूर जवळ पन्हाळा नावाचा किल्ला आहे, तो सुद्धा शिवाजी महाराजांनी घेतला. हे विजापूरच्या बादशाहाने ऐकले. तेव्हा तो चिडला. त्याने सिद्दी जोहार नावाचा मोठा सरदार निवडला. त्याला मोठे सैन्य दिले. त्याच्या बरोबर फाजलखान नावाचा सरदार सुद्धा दिला. फाजलखान हा अफझुलखानचा मुलगा. शिवाजीने आपल्या बापाला मारले. म्हणून फाजलखान चिडला होता.

मग सिद्दी जोहारने पन्हाळगडाला वेढा घातला. शिवाजी महाराज पन्हाळगडावर अडकले. पन्हाळगडावरचे धान्य व पाणी संपावयास लागले. तेव्हा शिवाजी महाराजांनी सिद्दीस निरोप पाठविला, "उद्या गड तुम्हांला देतो." सिद्दीला आनंद झाला. त्याचे पहारेकरी खूष झाले. पहारा ढिला पडला.



त्या दिवशी रात्रीची गोष्ट. शिवाजी महाराजांनी बाजी प्रभू देशपांडे आणि इतर निवडक मावळे घेतले. ते पहाऱ्यातून निसटले. ते विशाळगडाकडे निघाले. काही वेळाने ही बातमी सिद्दीस समजली. तो आणि फाजलखान सैन्य घेऊन विशाळगडाकडे निघाले. एका खिंडीपर्यंत शिवाजी महाराज आले. त्या खिंडीचे नाव घोडखिंड. मागून मुसलमान सैन्य आले. मग बाजीप्रभू शिवाजी महाराजांस म्हणाले, "महाराज, मी सैन्य येथेच थोपवून ठेवतो. आपण विशाळगडावर पुढे जा. तेथे पोहोचला म्हणजे पाच तोफा उडवा. तोपर्यंत मी हा शत्रू अडवून धरतो." शिवाजीमहाराज पुढे निसटले. इकडे मुसलमानांचे खूप सैन्य आले. केवढी लढाई झाली! बाजी प्रभूला पुष्कळ जखमा झाल्या, पण त्याने मुसलमान सैन्य पुढे जाऊ दिले नाही. इतक्यात फाजलखान नवीन मदत घेऊन आला. पुन्हा लढाई झाली. बाजी प्रभूला गोळी लागली. बाजी प्रभू पडला. इतक्यात तोफांचे पाच बार झाले. ते बाजीने ऐकले. तो म्हणाला, "महाराज सुखरूप पोहोचले. आता मी सुखाने मरतो." असे म्हणून वीर बाजी प्रभूने प्राण सोडला.

फाजलखानाचे सैन्य पुढे गेले. पण त्याला शिवाजीला पकडता आले नाही. वीर बाजी देशपांडे यांनी आपल्या शिवाजी महाराजांकरिता असे मरण पत्करले! धन्य तो वीर बाजी प्रभू!

☆ ☆

# स्वामिभक्त खंडोबल्लाळ



शिवाजीमहाराजांनंतर त्यांचा मुलगा संभाजी गादीवर बसला. दिल्लीला औरंगजेब बादशाहा राज्य करीत होता. त्याने खूप मोठे सैन्य घेतले. तो मराठ्यांवर चालून आला. त्याने संभाजीस पकडले. औरंगजेबाने संभाजीचे हालहाल केले आणि त्याला तुळापूर येथे ठार मारले.

सगळ्या मराठ्यांना फार वाईट वाटले. सगळे मराठे औरंगजेबावर चिडून उठले. संभाजीमहाराजांनंतर राजाराममहाराज गादीवर बसले. औरंगजेबाचे सैन्य फार मोठे होते. सैन्याने रायगडला वेढा दिला. तेव्हा सगळ्या सरदारांनी विचार केला. त्यांनी ठरवले की राजारामाने रायगड सोडून

जिंजी येथे जावे. जिंजी हे ठिकाण दक्षिण भारतात आहे.

खंडो बल्लाळ चिटणीस वगैरे निवडक लोक घेऊन राजाराम निघाला. त्यानी बैराग्याचा वेष घेतला. ही बातमी औरंगजेबास समजली त्याने सगळ्या ठाणेदारांस कळविले की, राजारामाला हुडकून काढा. राजाराम, खंडोबल्लाळ आणि इतर लोक यांना फार त्रास झाला. एके दिवशी हे सगळे लोक एका धर्मशाळेत उतरले होते. तेथे राजाराम पाय धूत होता. त्याच्या पायांवर एका नोकराने पाणी घातले. धर्मशाळेतल्या इतर लोकांनी हे पाहिले. ते कुजबूज करू लागले. त्यांनी हे ठाणेदारास सांगितले. तेवढ्यात खंडोबल्लाळने राजारामास अगोदरच पुढे पाठविले. आपण मात्र धर्मशाळेत राहिला. इतक्यात एक मुसलमान ठाणेदार आला. त्याने खंडोबल्लाळाला पकडले. त्याला साखळदंडाने बांधले. त्याच्या डोक्यावर मोठे मोठे दगड दिले. ठाणेदाराने विचारले, ''बोल कुठे आहे राजाराम? इतके हाल झाले तरी खंडोबल्लाळ बोलला नाही. मग ठाणेदाराने खंडोबल्लाळ याला फटके मारले. राखेचा तोबरा दिला, मिरच्यांची धुरी दिली, पण आपल्या मालकाचा पत्ता त्याने लागू दिला नाही. तो म्हणाला, ''आम्ही रामेश्वराचे यात्रेकरू. आम्हांला काय माहीत राजाराम का कोण तो?'' ठाणेदाराने पुन्हा खूप फटके दिले, खूप छळले, तरी सुद्धा खंडोबल्लाळाने आपल्या धन्याचा पत्ता लागू दिला नाही.

ठाणेदाराने मग खंडोबल्लाळाला सोडून दिले. त्याला वाटले, खरेच याला माहीत नाही. इकडे राजाराम महाराज जिंजीला सुखरूप पोहोचले. आपल्या धन्याचे प्राण वाचावेत म्हणून खंडोबल्लाळाने केवढी शिक्षा सहन केली! म्हणून खंडोबल्लाळाला स्वामिभक्त खंडो बल्लाळ म्हणतात.

☆ ☆

# महाराणी ताराबाई

"राजारामाची पत्नी ताराबाई, भद्रकाली देवीप्रमाणे कोपली आहे, दिल्लीची बादशाही अगदी केविलवाणी झाली आहे. बादशाहा औरंगजेबाचे तेज नाहीसे झाले आहे" अशा अर्थाचे काव्य एका कवीने लिहिले आहे. का बरे कोपली ही महाराणी?

सन १७०० मध्ये राजारामाचा मृत्यू झाला. मराठी राज्य टिकणार कसे असा प्रश्न निर्माण झाला. पण महाराष्ट्राची शूरांची परंपरा तुटली नव्हती. राजारामाची पत्नी ताराबाई धैर्याने पुढे आली. आपला पुत्र शिवाजी (दुसरा) यास गादीवर बसवून ती मराठी राज्याचा कारभार पाहू लागली.

औरंगजेबाला वाटले, मराठेशाही संपली, संभाजीस ठार केले, त्याचा मुलगा आपल्या कैदेत आहे, राजाराम मरण पावला. आता लढणार कोण आपल्याशी? पण त्याला रोज वेगळ्याच वार्ता ऐकू येऊ लागल्या. आज काय मोगल सैन्याची रसद लुटली, आज काय अमुक किल्ल्यावर मराठी सैन्य तुटून पडले, आज काय मोगली खजिना मराठ्यांनी लुटला!

बादशाहा संतापला. तो म्हणाला, "ये मराठे आदमी नही, शैतान है." त्यातच बादशाहा मरण पावला. काळ होता इ. स. १७०७.

ताराबाई मोठी महत्वाकांक्षी स्त्री होती. मोगलांशी लढण्यात तिने चांगलीच चिकाटी व उत्साह दाखविला. निरनिराळ्या सरदारांना मोगली प्रदेशात पाठवून धुमाकूळ मांडला. मोगलांवर विजय मिळविला.

इकडे राजा शाहू याची औरंगजेबाच्या बंदीवासातून मुक्तता झाली. शाहू महाराष्ट्रात येण्यास निघाला, पण ताराबाईला ही गोष्ट फारशी आवडली नाही. तिने संकटकाळात मराठी राज्य राखून धरले होते व मराठी राज्याचा वारसा त्यामुळे आपणाकडेच यावा अशी तिची इच्छा होती. पण धनाजीसारख्या सरदारांनी शाहूची बाजू उचलून धरली. ताराबाई अपयशी झाली.

पण शाहूच्या मृत्यूनंतर ताराबाईची राज्य चालविण्याची इच्छा पुन्हा बळावली. शाहूला मूलबाळ नव्हते. त्यामुळे दत्तक प्रश्नाची चर्चा सुरू झाली. अखेर ताराबाईचा एक नातू रामराजा यास शाहूने दत्तक घेण्याचे

मान्य केले. त्याचे नावाने आपण राज्यकारभार करावा, अशी ताराबाईने खटपट सुरू केली. पण त्यातून तिचे व नानासाहेब पेशव्यांचे भांडण सुरू झाले. रामराजाचा ओढाही पेशव्यांकडेच जास्ती होता. अखेर ताराबाईला माघार घ्यावी लागली. राज्यकारभार करण्याची तिची महत्वाकांक्षा अपूर्णच राहीली. तिचे शेवटचे दिवस दुःखात गेले. इ. स. १७६१ मध्ये ती मरण पावली.

ताराबाई महत्वाकांक्षी आणि धाडसी स्त्री होती. पराक्रमाचा वारसा तिला लाभला होता. तिने शाहूस विरोध केला हे खरे पण त्यामागे तिचा विचार असा होता की, मराठ्यांचे राज्य महाप्रयासाने आपण तारले, म्हणून आपणच मराठी राज्य चालविण्यास खऱ्या अधिकारी आहोत.

शाहू परतल्यावर तिने त्याच्या राज्यात काही अडचणी निर्माण केल्या हे ठीक झाले नाही, तथापी स्वराज्यावरील संकटकाळात तिने शत्रूशी दोन हात करून त्यात विजय मिळविला. दक्षिण भारतात मोगलांचे राज्य स्थिर करण्याची औरंगजेबाची महत्वाकांक्षा तिने धुळीला मिळविली आणि स्वराज्याचे रक्षण केले. भारतात ज्या थोर स्त्रिया होऊन गेल्या त्यात महाराणी ताराबाईचे स्थान फार मोठे आहे.

☆ ☆

# शूर बाजीराव

**आ**पल्या महाराष्ट्रात छत्रपती शाहूमहाराज राज्य करीत होते. ते साताऱ्यास राहात असत. राज्याचा कारभार पहिले बाजीराव पाहात असत. ते पुण्यास शनवारावाड्यात राहात असत.

पहिले बाजीराव फार रुबाबदार दिसत. तसेच ते लढाईमध्ये सुद्धा फारच पराक्रम करीत. एवढे मोठे पेशवे तरी ते स्वतः लढाईवर जात. ते दिवसचे दिवस घोड्यावर बसून राहात. खायला जे काही मिळेल ते खात असत. लढाईवर कोठले चांगले जेवण? त्यांचे सारे सरदारसुद्धा बाजीरावप्रमाणे शूर होते. काटक होते.

हैदराबादला निजामाचे राज्य होते. त्याचे मराठ्यांशी नेहमी वाकडे

होते. निजाम मराठ्यांशी लढे. पण लढाईत त्याचा पराभव होई. पुष्कळ वेळा असे झाले. निजामाचे सैन्य पुष्कळ होते. त्याच्या सैन्याला भरपूर जेवणखाण मिळे. लढाईतसुद्धा राहण्याची चांगली सोय होत असे. पण त्याचा प्रत्येक लढाईत पराभव होई. 'असे का होते?' असे निजाम म्हणाला. निजामाने बाजीरावास पाहिले नव्हते. लोक म्हणत, 'बाजीराव काटक आहे, शूर आहे.' मग निजामाने एक चित्रकार बोलावला. निजामाने त्याला सांगितले, "बाजीरावाचे एक हुबेहुब चित्र काढून आण."



चित्रकार पुण्याकडे आला. त्याने बाजीराव पाहिला. त्याचे सुंदर चित्र काढले. बाजीराव घोड्यावर स्वार झाला आहे. घोडा शेतातून धावत आहे. बाजीराव ज्वारीची कणसे तोडीत आहे. ती हातावर मळून खात आहे. लाल मिरची तोंडी लावीत आहे. तो दिसायला रुबाबदार आहे. त्याने लालभडक पगडी घातली आहे. हातात भाला घेतला आहे, असे ते चित्र होते.

निजामाने ते चित्र पाहिले. मराठे लोक लढाईवर जात होते. जे

मिळेल ते खात होते. घोड्यावरच बसून कित्येक वेळा राहात होते. असे ते काटक होते. म्हणून त्यांचा जय होत असे, हे निजामाने ओळखले, निजाम म्हणाला, "अरे, बाजी तर सैतान दिसतो!"

☆ ☆

# चिमाजी अप्पा

**प**हिले बाजीराव पेशवे निजामाचा बंदोबस्त करीत होते. त्याच वेळी पश्चिमेकडे पोर्तुगिजांनी उठाव केला. ते गोरे लोक मराठ्यांचा मुलुख ताब्यात घेत होते आणि हिंदू लोकांना जुलुमाने बाटवून ख्रिस्ती बनवीत होते.

त्या पोर्तुगिजांचा बंदोबस्त करण्यास बाजीरावाने आपला भाऊ चिमाजीअप्पा यास पाठविले. चिमाजीअप्पाने वसईच्या किल्ल्याला वेढा दिला.

त्या किल्ल्यावर पोर्तुगिजांची चांगलीच तयारी होती. मराठ्यांनी वेढा दिला. बरेच दिवस झाले तरी पोर्तुगीज दादच देईनात. किल्ला काही सर होईना. चिमाजीअप्पा आणि त्यांचे खंदे मराठे वीर त्रासून गेले. या मोहिमेत यश येईल असे कोणासच वाटेना.

एके दिवशी चिमाजी अप्पाने आपल्या सर्व सरदारांना एकत्र जमविले आणि मोठ्या आवेशाने सांगितले की, "वसईचा हा किल्ला घेण्यासाठी आपण प्रयत्नांची शिकस्त केली, पण किल्ला सर होत नाही. पोर्तुगिजापुढे आपण शरण जाणार काय? मरू पण हटणार नाही असा मराठ्यांचा बाणा. तेव्हा आता असे करा. मी तोफेच्या तोंडी उभा राहतो. ती तोफ उडवा म्हणजे माझे डोके तरी किल्ल्यात पडेल आणि मला समाधान वाटेल."

चिमाजीअप्पांचा हा निश्चय पाहून मराठे वीरांना जोर आला. त्यांनी जोराने हरहर महादेव अशी गर्जना केली. किल्ल्याला मोठे मोठे सुरुंग लावले. तटाला खिंडार पाडले आणि किल्ल्यावर एकदम हल्ला केला.

त्या युद्धात मराठ्यांना जय मिळाला. वसईचा किल्ला ताब्यात आला. चिमाजीअप्पा यांनी पोर्तुगिजांचा बंदोबस्त केला. त्यांना पळवून लावले.

हिंदू लोकांना सुखी केले.

बाजीराव पेशव्यांनी चिमाजीअप्पाचा गौरव केला.

☆ ☆

# माधवराव पेशवे



**थो**रले माधवराव पेशवे यांनी निजामावर स्वारी केली. पेशव्यांचे सैन्य आणि निजामाचे सैन्य यांची मोठी लढाई झाली. निजामाचा पराभव झाला आणि त्याने पेशव्यांशी तह केला.

लढाई आटपून माधवराव पेशवे पुण्याकडे परतले. वाटेत बारामतीला त्यांचा मुक्काम पडला. बाबूजी नाईक हे बारामतीचे सावकार. त्यांनी फार आग्रह केला म्हणून माधवरावाने बारामतीला चार दिवस मुक्काम केला. बाबूजी नाईकाने पेशव्यांना थाटाची मेजवानी दिली. दुपारच्या वेळी पेशव्यांसाठी हत्तीचा खेळ ठेवला होता, पेशव्यांची स्वारी बिछायतीवर बसली. माधवरावांच्या शेजारी त्यांचा धाकटा भाऊ नारायणराव बसला

होता. निरनिराळे सरदार आणि मानकरी बसले होते. इतक्यात फौजेतील एक माजलेला हत्ती मोकाट सुटला आणि पेशवे बसले होते तिकडे येऊ लागला. तो हत्ती रागाने संतापला होता. त्याला आवरण्यासाठी माहूत, भालेकरी वगैरे सारेजण धावपळ करीत होते, तर कोणी आपल्या हातातील भाले उगारून हत्तीला टोचीत होते, तर कोणी त्या हत्तीला त्याच्या लाडक्या नावाने हाका मारीत होते. पण कोणालाही न जुमानता तो हत्ती पुढे पुढे जात होता.

पुढे येता येता तो हत्ती माधवराव पेशवे बसले होते, तिकडे आला. माधवरावांच्या शेजारी नारायणराव बसला होता. संतापलेला हत्ती आपल्याकडे येत आहे हे दिसताच नारायणराव घाबरून उठू लागला. माधवरावांनी ते पाहिले. त्यांनी लगेच नारायणरावचा हात धरला आणि त्याला खाली बसविले. ते म्हणाले, ''नारायणा, उठतोस काय! बैस खाली. तुला असा घाबरून बैठकीवरून उठून जाताना कोणी पाहिले तर लोक काय म्हणतील? इतिहासकार तुझ्याबद्दल काय लिहितील? अरे, हत्तीच्या पायी आपला मृत्यू नसला तर ह्या माजलेल्या हत्तीकडून आपल्याला काहीही इजा व्हायची नाही.''

माधवरावांचा धीर पाहून भोवतालचे सारे लोक चकित झाले. इतक्यात जवळच्या एका सरदाराने आपल्या हातातील भाला हत्तीवर रोखून फेकला, दुसऱ्या सरदाराने आपल्या हातातील कट्यार हत्तीच्या रोखाने फेकली. त्यामुळे हत्ती माघारी फिरला. मागे भाले घेऊन लोक उभे होतेच. त्यांनी चोहीकडून भाले टोचून हत्ती उभा केला आणि हे संकट टळले.

☆ ☆

# रामशास्त्री प्रभुणे

सतरा-अठरा वर्षांचा एक तरुण शागीर्द एका सावकाराच्या पायावर पाणी घालत होता. पाण्याची धार जरा चुकली म्हणून ते म्हणाले, ''काय राम्या, कोठे पहातो आहेस?'' रामाने उत्तर दिले, ''महाराज आपल्या कानातल्या भिकबाळीकडे मी पहात होतो.''

“अरे गड्याला का कोठे हा दागिना मिळतो? त्याला विद्या यावी लागते.” ते ऐकून राम तडफेने म्हणाला, “मग मी विद्या मिळवीन आणि स्वराज्यात मोठा मान मिळवीन!”

पुढे सावकार ते बोलणे विसरले. रामाच्या मनाने घेतले होते की, आता आपण धोतरे बडवणार नाही. त्याने काशीस जाऊन विद्या शिकण्याचे ठरविले. त्यावेळी प्रवास कठीण असे आणि दिवसही पुष्कळ लागत. काशी म्हणजे विद्येचे माहेरघर. म्हणून राम तेथे गेला.



रामाचे वय विद्या शिकण्याच्या पुढे गेलेले. त्याला धड संस्कृत शब्दांचे उच्चार करता येत नसत, पण चिकाटीने त्याने रात्रंदिवस अभ्यास चालविला. हळूहळू तो संस्कृत भाषा तर शिकलाच. पण धर्म, न्याय इत्यादी शास्त्रांतही तो पारंगत झाला. इतके शिकण्यास त्यास बारा वर्षे लागली. नंतर तो पुण्यास परतला. तेव्हा तो रामा शागीर्द राहिला नव्हता. आता लोक त्यास रामशास्त्री म्हणू लागले होते. थोरले माधवराव यावेळी पेशवे होते. त्यांनी त्यांचे स्वागत केले. आणि त्यांना आपले मुख्य न्यायाधीश नेमले.

रामशास्त्री प्रभुणे अगदी निरिच्छ आणि स्पष्ट बोलणारे होते. ते काही महत्वाच्या सरकारी कामासाठी दोन-तीन वेळी माधवराव पेशव्यांकडे गेले. प्रत्येक वेळी माधवराव पेशवे देवपुजा करत असल्याने त्यांना थांबून रहावे लागले. त्या नंतरच्या भेटीत ते म्हणाले, "आपण दोघे काशीला जाऊ म्हणजे स्नान, संध्या, पूजा यात आपणास सर्वच वेळ घालविता येईल." माधवरावांच्या सर्व लक्षात आले. ते म्हणाले, "खरेच, राज्यकारभार करणे हीच आमची स्नानसंध्या आहे." आणि त्याचप्रमाणे माधवराव वागू लागले.

माधवरावानंतरचा पेशवा नारायणराव याचा खून करण्यात आला. त्याचा चुलता राघोबा याने हा प्रकार केला, असे लोक कुजबुजत असत. त्याला वाटले की, रामशास्त्र्यांकडून आपण निर्दोषी आहोत असे ठरवावे, म्हणजे बरे होईल. त्याने रामशास्त्र्यांना बोलाविले. शास्त्रीबुवा म्हणजे प्रत्यक्ष नि:स्पृहता. ते म्हणाले, "तुमचा संबंध या खुनाशी असलाच पाहिजे. याला शिक्षा फाशीची. मला तुमचा पैसा नको आणि नोकरी नको. हा मी चाललो पुणे सोडून."

खरोखरच रामशास्त्री आपल्या गावी म्हणजे साताऱ्याजवळ माहुलीला गेले आणि स्नान-संध्येत सर्व काळ घालवू लागले.

☆ ☆

# महादजी शिंदे

**प**खालीचा बैल चालला होता. त्याच्या गळ्यातले एकच घुंगरू वाजत होते. बैलावरची पखाल रिकामी होती. खिन्न होऊन बैलामागून राणाखान चालला होता. डोळ्यांपुढे पानपतावरील कापाकापी नाचत होती. चाहूल घेत सावधगिरीने राणाखान भराभर चालला होता. इतक्यात त्याच्या कानांवर विव्हळण्याचा आवाज ऐकू आला! त्याने कान देऊन ऐकले. पुन्हा ऐकले. 'कोण असेल बरं?' तो म्हणाला. आवाजाच्या दिशेने तो पुढे चालू लागला.

एक नाला होता. जवळच पाण्याचे डबके होते. त्याच्या कडेला एक मनुष्य त्याच्या दृष्टीस पडला. चटकन त्याच्या तोंडून उद्गार आला,

"अरेरे!"

तो मनुष्य पालथा पडला होता. पण त्याचे हाडपेर दणदणीत होते. तो शिपाई गडी होता. राणाखान खाकरला. तो मनुष्य उठण्याची धडधड करू लागला. दोघांची दृष्टादृष्ट झाली. राणाखान एकदम ओरडला, "धनी! तुम्ही येथे?" तो मनुष्य न्याहाळून पाहू लागला. "कोण? राणाखान?"



"चला धनी कुणी गनीम यायच्या आत चला! बसा माझ्या पखालीच्या बैलावर.'

"ज्यानं घोड्यावर मांड टाकायची त्या महादजी शिंद्यावर पखालीच्या बैलावर बसण्याची पाळी यावी ना! राणाखान तू मला देव भेटलास! तू माझा भाई झालास! चल आता दक्षिणेत!" राणाखानाने आपला धनी महादजी शिंदे यांना सुखरूप दक्षिणेत आणले. हे उपकार जाणून महादजीने त्यास एक गाव इनाम म्हणून दिला.

महादजी हा मोठा शूर होता. त्याने आपले सैन्य खूप वाढविले डी. बॉईन या फ्रेंच माणसाला पदरी ठेवून त्याच्याकडून आपल्या

सैन्याला कवायतीचे शिक्षण दिले. ह्या सैन्याच्या जोरावर त्याने दिल्लीच्या मोगल दरबारात मराठ्यांचे वजन पुन्हा वाढविले. शहाआलम बादशाहाला दिल्लीच्या तक्तावर बसण्यास त्याने मदत केली.

सुमारे पंधरा वर्षे दिल्लीची सत्ता महादजीच्या हाती होती. त्याने पुढे गोवधबंदीची आज्ञा काढविली. दिल्लीच्या बादशाहाकडून त्याने पेशव्यांसाठी वकील-इ-मुतलक (खास प्रतिनिधी) अशी पदवी आणली.

इंग्रज मराठे यांच्यात इ. स. १७७९ मध्ये तळेगाव-वडगाव ह्यांच्या दरम्यान झालेल्या लढाईत महादजीने मोठे शौर्य दाखविले आणि इंग्रजांचा पूर्ण पराभव केला. ह्या विजयामुळे तो पेशव्यांचा आवडता सरदार बनला.

महादजी जरी एका पायाने लंगडा झाला होता, तरी त्याचे युद्धकोशल्य नावाजण्यासारखे होते. त्याचे बोलणे गोड होते तसेच हाताखालच्या माणसाकडून आपले काम साधून घेण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. वानवडी येथे महादजी शिंद्यांची छत्री (समाधी) पाहण्यासारखी आहे.

☆ ☆

# अहिल्याबाई होळकर

**अ**हिल्याबाई होळकर ही उत्तर हिंदुस्थानातील इंदूरचे कर्तबगार सुभेदार मल्हारराव होळकर यांची सून होय.

मल्हाररावाच्या म्हातारपणी आणि त्याच्या नंतर तीच इंदूर संस्थानचा कारभार पहात असे. तिचा नवरा म्हणजे मल्हाररावाचा मुलगा खंडेराव हा एका लढाईत मरण पावल्याने राज्यकारभार पाहण्याची जबाबदारी तिच्यावर आॅली. ते काम तिने चांगल्या रीतीने करून लौकिक मिळविला.

इ.स. १७६० ची गोष्ट. मल्हारराव उत्तर हिंदुस्थानात लढाईत गुंतला असता इंदूर परगण्यात एका रानटी जमातीने दंगल सुरू केली. तिच्याजवळ फारसे सैन्य नव्हते. तेव्हा तिने युक्ती योजली. 'जो कोणी या जमातीचा दंगा मोडून काढील त्याला मी आपली मुलगी देईन.' असे तिने

जाहीर केले. यशवंतराव फणसे नावाच्या माणसाने पुढाकार घेऊन सैन्याची जमवाजमव केली व त्या जोरावर दंगा मिटविला. जाहीरनाम्याप्रमाणे अहिल्याबाईने आपल्या मुलीचे लग्न त्याच्याशी लावले.



मल्हाररावाच्या मृत्यूनंतर तिच्यावर कठीणच प्रसंग आला होता. पेशव्यांचा चुलता राघोबा याने इंदूरवर स्वारी केली. होळकर घराण्यात मूलबाळ नसल्याने ही जहागीर स्वत: गिळंकृत करण्याचा त्याचा विचार होता. अहिल्याबाई डगमगली नाही. तिने शिंदे आणि भोसले यांजकडून मदत मागविली. पेशव्यांसही लिहिले. राघोबाचा मुक्काम जवळ येऊ लागला. तेव्हा तिने राघोबास निरोप पाठविला, "तुम्ही आमचे धनी. तुम्ही लोभ धरून आमच्यावर स्वारी करीत आहात! पण लक्षात ठेवा, मीही सुभेदाराची सून आहे! माझ्याजवळ सैन्य आणि स्त्रियांची पलटण आहे. माझा पराभव झाला तर बाई माणूस म्हणून मला कोणी हसणार नाही." राघोबाला विचार पडला आणि त्याने कळविले की, "तुमचा मुलगा वारला, म्हणून तुमच्या समाचारास येत आहोत!" काही दिवस पाहुणचार घेऊन तो परतला.

अहिल्याबाईचा दिवसाचा कार्यक्रम ठरलेला असे. ती सकाळी पूजा आणि जप करी नंतर पुराण ऐके. दुपारी दरबारात बसे. सायंकाळी पूजाअर्चा होई आणि मग ती फराळ करी. ती शाकाहारी होती. दानधर्म करण्यात तिला आनंद वाटे. तिने काशी, प्रयाग, नाशिक इत्यादी ठिकाणी धर्मशाळा, तलाव, घाट, देवळे बांधली. काही ठिकाणी अन्नछत्रे सुरू केली. अद्यापीही त्यातील कित्येक चालू आहेत. अहिल्यादेवीने तीस वर्षे राज्यकारभार केला. लोक तिला देवतेचा अवतार समजत, इतकी तिची योग्यता थोर होती.

☆ ☆

# नाना फडणीस

**नाना** फडणीस फार चतुर होते. सवाई माधवराव पेशवे होते तेव्हा नाना फडणीस त्यांचे मुख्य कारभारी होते. त्यांनी राज्य उत्तम प्रकारे राखले. आपल्या राज्यातील सगळ्या बातम्या ते काढीत. गुप्त रीतीने बातमी देणाराला हेर म्हणतात. असे हेर नानांजवळ पुष्कळ असत. ते शत्रूच्या बातम्यासुद्धा नानांना कळवीत. मग नाना शत्रूंचा बंदोबस्त करीत.

यावेळी इंग्रज लोकांचा एक वकील होता. त्याचे नाव मॅलेट. तो फार हुशार होता. तो पुण्याजवळ राहात असे. त्याला लढाईचे सामान जमवावे असे वाटले. त्याचा मुख्य अधिकारी मुंबईला होता. तेथून तोफा आणाव्यात असे त्याने ठरविले. पण मुंबईहून तोफा आणायच्या कशा? त्याने एक युक्ती केली. पेशव्यांना एक पत्र लिहिले, "आमचे खाण्या-पिण्याचे सामान मुंबईहून आणावयाचे आहे, ते चार मेण्यांतून येईल. त्याला परवानगी द्यावी." असे ते पत्र होते. नाना फडणीसाने परवानगी दिली.

नेहमी मेणे येऊ लागले, घाटावर तपासणी झाली की, मेणे पुण्यात येत. पण एकदा मात्र गंमत झाली. घाटावर होता नाकेदार. त्याने मेणे अडविले. नाना फडणीसांस कळवले. मेण्यात तोफा होत्या.

ही बातमी मॅलेटला समजली. त्याची युक्ती फसली. तो मेण्यांतून तोफा आणीत होता. मग त्याने कांगावा सुरू केला. नाना फडणीसाला रागाने पत्र लिहिले, "नेहमी आमचे मेणे सोडता, मग आजच आमचे मेणे का अडविले?"

नाना फडणीसाला हेरांनी बातमी दिलीच होती. या खोट्या इंग्रजांची खोड मोडायचे त्यांनी ठरविले. नाना फडणीसाने मॅलेटला पुन्हा पत्र लिहिले,



"वकीलसाहेब, तुम्ही मुंबईहून तुमचे खाणे पिणे मागवीत होता ते आम्ही अडविले नाही. मग आजच का बरे मेणे अडविले, याचे कारण तुम्हांला माहित आहे. मग आम्हांला का विचारता?"

इंग्रज मेण्यातून तोफा लपवून आणीत होते आणि ते नाना फडणीसाला समजले. मॅलेट साहेबांची फजिती झाली. मग त्याने नानाला पत्र पाठविले "आम्ही पुन्हा असे करणार नाही." तो नेहमी म्हणे, "जोवर नाना फडणीस आहेत, तोवर मराठ्यांचे राज्य कोणी घेणार नाही."

☆ ☆

# बापू गोखले

कोकणातील तळे या नावाचे गाव. तेथील जमीनदार गणेशपंत गोखले. त्यांचा मुलगा बापू. बापूचा चुलता धोंडोपंत गोखले. हे विजयदुर्ग किल्ल्यावर पेशव्यांचे सरदार गंगाधरपंत भानू यांच्याकडे नोकरीला होते.

एकदा गंगाधरपंत भानू पुण्याला गेले होते. त्यावेळी कोळ्यांनी बंड केले आणि विजयदुर्गावर हल्ला केला. धोंडोपंत गोखल्यांनी ते बंड मोडले. कोळ्यांचा बंदोबस्त केला.

धोंडोपंत गोखल्यांचा हा पराक्रम नाना फडणविसांना कळाला. त्यांनी धोंडोपंतांना पुण्यास बोलावले. धोंडोपंतांबरोबर बापूही पुण्यास आले. त्यांचा सत्कार पेशव्यांनी केला.

कर्नाटकातील बंडाचा बंदोबस्त करण्यास धोडोपंत, गणेशपंत व बापू गोखले यांना पाठविण्यात आले. तेथे सरदार बापू गोखले यांनी मोठा पराक्रम केला. त्यामुळे पेशवे दरबार बापू गोखल्यांवर फारच खूश झाला. पेशव्यांनी बापू गोखले यांना सेनापती नेमले.

'म्हैसूरचा वाघ' टिपू सुलतान याच्याबरोबर मराठ्यांचे युद्ध झाले. त्या युद्धात सरदार बापू गोखले यांनी चांगलाच पराक्रम दाखविला. पण ते त्या युद्धात घायाळ होऊन पडले.

त्या युद्धात बापू गोखल्यांचे चुलते धोंडोपंत मारले गेले. त्या रागाने बापू गोखल्यांनी खूपच जोराने युद्ध केले, पण त्यांना खूप जखमा झाल्या. शेवटी मराठ्यांना जय मिळाला तेव्हा बापू गोखल्यांना आनंद झाला. त्यांचा सत्कार करण्यात आला.

नाना फडणविसांना कैदेत टाकून इंग्रजाच्या साहाय्याने दुसऱ्या बाजीरावाने पेशवाई मिळविली. पण पुढे पुढे इंग्रजांचे वर्चस्व बाजीरावाला सहन होईना. म्हणून बाजीरावाने सेनापती बापू गोखले यांच्या साहाय्याने इंग्रजांशी बंड पुकारले.

त्या युद्धात सरदार बापू गोखले यांचा पराक्रम पाहून इंग्रज सेनापतीही थक्क झाला, परंतु इंग्रजांचे अफाट बळ आणि मराठ्यांचा पडता काळ यामुळे मराठ्यांचा पराभव झाला आणि पेशव्यांचे हे शेवटचे सेनापती सरदार बापू गोखले मारले गेले.

☆ ☆

# राणी लक्ष्मीबाई

२८०२



दुसऱ्या बाजीरावाकडे मोरोपंत तांबे नावाचे गृहस्थ नोकरीला होते. दुसऱ्या बाजीरावाला दोन मुलगे होते. एक नानासाहेब आणि दुसरे बाळासाहेब. मोरोपंताना एक मुलगी होती. तिचे नाव मनुताई. ही सर्व मुले एकाच वयाची. लहानपणी ती एकत्र खेळत, घोड्यावर बसत, हत्तीवर बसत, लुटूपुटीच्या लढाया खेळत, तलवारीचे हात करीत, बंदुकीचे नेम मारीत.

पुढे मनुताईचे लग्न झाशी संस्थानाचे राजे गंगाधरराव यांच्याशी झाले. त्या वेळेस झाशीचा कारभार इंग्रजांकडे होता. गंगाधररावांच्या लग्नाच्या वेळेसच झाशीचा राज्यकारभार त्यांच्याकडे आला. मनूताईच्या पायगुणानेच जणू ही 'राज्यलक्ष्मी' परत मिळाली म्हणून त्यांनी तिचे नाव लक्ष्मीबाई ठेविले.

राणी लक्ष्मीबाई घोड्यावर बसण्यात पटाईत होत्या. त्यांना घोड्यांची चांगली पारख करता येत असे. एकदा एका सौदागर म्हणजे घोडे विकणारा तिच्याकडे दोन सारखे दिसणारे घोडे घेऊन आला व त्याने

राणीला त्यांची परीक्षा करून ते विकत घेण्याबद्दल विचारले. दोन्ही घोडे सारखेच देखणे आणि चलाख होते. राणी एका घोड्यावर बसून हिंडून आली. नंतर दुसऱ्या घोड्यावर बसून हिंडून आली. मग तिने एका घोड्याची किंमत पन्नास रुपये व दुसऱ्या घोड्याची किंमत हजार रुपये केली. "दिसायला तर दोन्ही घोडे सारखे मग किंमतीत इतका फरक का?" लोकांनी विचारले. राणी म्हणाली, "एक घोडा चांगला असून दुसरा दिसायला तसाच असला तरी त्याची छाती फुटली आहे. तो लांबची मजल मारायला निरुपयोगी आहे."

सौदागरने तिच्या घोड्यांच्या परीक्षेची वाहवा केली व तिने केलेल्या किंमतीस ते घोडे विकत दिले.

या लक्ष्मीबाईला एक मुलगा झाला पण तो लहानपणीच वारला. त्यामुळे गंगाधररावांनी एक मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव दामोदर ठेविले. परंतु लवकरच गंगाधरराव वारले. त्यामुळे लक्ष्मीबाईवर दुःखाचा डोंगरच कोसळला!

आपला लहान मुलगा व आपली प्रजा यांकडे लक्ष देऊन राणी आपले दुःख कमी करते तोच इंग्रजांनी झाशीचे राज्य खालसा केल्याचा हुकूम काढला. राणीला या गोष्टीचा राग आला. ती म्हणाली, "माझी झाशी देणार नाही! (मेरी झाशी नहीं दूँगी!) लवकरच इंग्रज अधिकारी आपले सैन्य घेऊन, झाशीला आले. त्यांनी किल्ल्याला वेढा दिला. राणीने बरेच दिवस किल्ला लढविला. शेवटी झाशीचा किल्ला शत्रूच्या हाती जाण्यापूर्वीच ती किल्ल्यातून निसटली. तिने आपल्या मुलाला पाठीशी बांधले आणि घोड्यावर बसून तटावरून आपला घोडा फेकला. ती मोठ्या कष्टाने ग्वाल्हेरास पोहोचली. तेथेही इंग्रज सैन्याची व तिची लढाई झाली. अखेर त्यातच ती मरण पावली.

☆ ☆

# महात्मा ज्योतिबा फुले



आपल्या देशात जे थोर लोक होऊन गेले त्यात महात्मा ज्योतिबा फुले हे एक प्रमुख आहेत.

ज्योतिबांचा जन्म २७ नोव्हेंबर १८२७ रोजी झाला. गोविंदराव गोऱ्हे हे त्यांचे वडील. ज्योतिबाची आई लहानपणीच वारली. ज्योतिबा शाळेत फारसा गेलाच नाही. नेहमी बागेत काम करायचा. पण शेजाऱ्याने ज्योतिबाला उपदेश केला आणि ज्योतिबा शाळेत जाऊन शिकू लागला. तो इंग्रजी सातवीपर्यंत शिकला. तो खूप वाचायचा, खूप लिहायचा, खूप तालीम करायचा.

शिक्षणानेच आपल्या देशाची उन्नती होईल, हे ज्योतिबांनी जाणले. त्यांनी मुलींसाठी आणि नंतर हरिजनांसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. हरिजनांचा उद्धार करण्यासाठी ज्योतिबा रात्रंदिवस उद्योग करीत.

एकदा काय झाले, उन्हाळ्याचे दिवस होते. दुपार झाली होती. रस्ते तापून निघाले होते. डोक्याला उन्हाचा चटका लागत होता. पुण्यात त्यावेळी पुष्कळ हौद होते, त्यापैकी एका हौदावर पुष्कळ मंडळी

आंघोळ करीत होते. लोक पाणी नेत होते. हसत खिदळत काही लोक येत जात होते. आणि पलीकडे सुद्धा काही हरिजन बायकामुले उभी होती. त्यांच्याजवळ भांडी होती डबे होते. त्यांना हौदावरचे पाणी घरी न्यायचे होते. पण ते होते हरिजन! त्यावेळी हरिजनांना इतर कोणीही शिवत सुद्धा नसत. मग त्यांना हौदावर कोण येऊ देणार?

ते बिचारे हरिजन उभे होते. येणाऱ्याजाणाऱ्यास म्हणत होते, "दादा थोडं पाणी घालता का आम्हाला?" पण त्यांच्याकडे कोणी पाहातसुद्धा नव्हते. सगळे लोक आपापल्याच तोऱ्यात. उलट ते हरिजनांवरच खेकसत, "ए दूर हो, दूर हो! शिवशिलना आम्हाला! ए महारा! चल हो बाजूला!" बिचारे महार (हरिजन) दूर होत. पुन्हा पाणी मागत. त्या रस्त्याने एक दयाळू मनुष्य चालला होता. त्यांच्या अंगात अंगरखा, डोक्याला मुंडासे होते. त्यांनी हे पाहिले. त्यांना किती किती वाईट वाटले. त्याच्या डोळ्यांत टचकन् पाणी आले. तो गृहस्थ म्हणाला, "चला मी देतो तुम्हांला पाणी! माझ्या घरी चला. रोज येत जा तुम्ही. खुशाल पाणी घेऊन जात जा!" त्या हरिजनांना किती आनंद झाला! ते सगळे त्या दयाळू माणसाच्या घरी गेले. हरिजनांनी खूप पाणी नेले. सगळे म्हणाले, "ज्योतिबा फुले की जय!"

अशा रीतीने ज्योतिबा गरीबांचे देव बनले. काही जुन्या मताच्या लोकांनी त्यांचा छळ केला पण त्यांनी आपले समाजसेवेचे काम चालू ठेवले. लोक त्यांना महात्मा म्हणू लागले. इ. सन १८९० मध्ये ते मरण पावले. त्यांची आठवण म्हणून पुण्यातील मंडईला 'फुले मंडई' असे नाव दिले आहे.

☆ ☆

# स्वामी विवेकानंद

**क**लकत्त्याच्या एका शाळेतील तीन चार मुले विचार करीत होती. नवीन प्रकारची एक बोट बंदरास लागली आहे. ती आपण कशी पाहू शकू? तेथे जायचे म्हणजे अधिकाऱ्याची परवानगी लागत असे.

ती आपणा मुलांना कशी मिळणार? पण त्यांच्यात एक चतुर मुलगा होता. त्याने शाळा सुटताच आपल्या सोबत्यांसह बंदर गाठले. परवानगीसाठी साहेबांच्या बंगल्याकडे ते जाऊ लागले, पण रखवालदार आत जाऊ देईना. 'साब अभी नही मिलेंगे, चले जाव' असे म्हणून त्याने त्यांना हाकलले. जरा परत गेल्यासारखे करून नरेंद्राने रखवालदाराचा डोळा चुकवून दुसऱ्या फाटकातून आत प्रवेश मिळविला. बंगल्यात दुसऱ्या मजल्यावर साहेब येरझरा घालताना त्याला दिसले. तो थेट वर गेला आणि त्यांना भेटला. मुलाच्या धाडसाचे कौतुक वाटून साहेबाने परवानगीची चिठ्ठी त्याला दिली. परत येताना नरेंद्र मोठ्या ऐटीत रखवालदारापुढून आला आणि त्याला म्हणाला, "ही पहा परवानगी." हा मुलगा म्हणजेच नरेंद्रनाथ दत्त. याचेच नाव पुढे स्वामी विवेकानंद असे पडले.



शिक्षण चालू असतानाच रामकृष्ण परमहंस या स्वामींची व नरेंद्राची भेट झाली. परमहंसाचे ज्ञान पाहून नरेंद्र त्यांचा शिष्य झाला. पुढे त्याने संन्यास घेतला. त्यांनी काही वर्षे धर्माच्या चिंतनात आणि अध्ययनात घालविली. याकाळात अमेरिकेत शिकागो येथे इ. स. १८९३ मध्ये

सर्व धर्मांची परिषद भरली; हिंदु धर्मांचे प्रतिनिधी म्हणून स्वामीजी तेथे गेले. या सभेत विवेकानंदांनी आपल्या विद्वतेने आणि बोलण्याच्या कलेने सर्वांवर छाप पाडली आणि हिंदुस्थान आणि हिंदुधर्म यांचे नाव गाजविले. त्यावेळी एका वर्तमानपत्राने लिहिले की, "धर्म परिषदेत श्रोत्यांनी शेवटपर्यंत थांबावे म्हणून स्वामींचे भाषण शेवटी ठेवीत. इतरांची भाषणे लोक कशीतरी ऐकत. पण विवेकानंद उठले की शेकडोजण शांतपणे त्यांचे भाषण ऐकत. पंधरावीस मिनिटे हे भाषण ऐकले तरी त्यांना आनंद होई."

विवेकानंदांनी अमेरिकेत प्रवास केला. अनेक शिष्य मिळविले आणि मठ स्थापिले. नंतर ते इंग्लंडला गेले. तेथेही त्यांना अनुयायी मिळाले. त्यांपैकी मार्गारेट नोबल ही शिष्या हिंदुस्थानात कायमची येऊन राहिली आणि तिने या देशाची सेवा केली. हिचेच हिंदु नाव भगिनी निवेदिता होय. स्वामीजींनी हिमालयात अल्मोरा व कलकत्त्याजवळ बेलूर येथे मठ स्थापले. तेथे गरीब, निराश्रित आणि पीडित यांना मदत आणि शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी सुरू केले.

"सर्व जग ईश्वरमय आहे आणि सर्व धर्म एक आहेत." ही त्यांची शिकवण होती. त्यांच्या या संदेशाने त्या काळच्या हिंदूत त्यांनी उत्साह निर्माण केला आणि त्यांची आपल्या धर्मांवर श्रध्दा बसविली.

☆ ☆

# दादाभाई नौरोजी

आपल्या भारताला आता स्वातंत्र्य मिळाले, पण त्यासाठी गेली कित्येक वर्षे हिंदुस्थानचे पुढारी इंग्रजांशी भांडत होते. निरनिराळ्या लोकांनी आणि संस्थांनी आपल्या शक्तीप्रमाणे स्वातंत्र्याचे प्रयत्न केले. कॉंग्रेस ही संस्था त्यात प्रसिद्ध आहे.

राष्ट्रसभेची म्हणजे कॉंग्रेसची स्थापना करणाऱ्यांपैकी दादाभाई नौरोजी हे प्रमुख देशभक्त होऊन गेले. हिंदी लोकांच्या हातांत राज्यकारभार

असावा म्हणून १८८५ साली त्या वेळच्या काही सुशिक्षित लोकांनी मुंबईस एक संस्था स्थापली. या संस्थेने सरकारकडे अधिकाराची मागणी करणे, लोकमत जागे करणे, आणि जनतेला सुख होईल असे कायदे पास करवून घेण्याची खटपट करण्याचे ठरविले. ही संस्था म्हणजेच आजची राष्ट्रीय सभा.



दादाभाईचा जन्म गुजराथेत नवसारी येथे एका पारशी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नौरोजी आणि आईचे नाव माणकाबाई. दादाभाई अत्यंत बुद्धिवान, गरिबीत वाढलेले आणि उद्योगप्रिय होते. ते खूप शिकले. प्रथम त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. नंतर व्यापारात त्यांनी लौकिक मिळविला. मग काही काळ ते बडोद्याचे प्रधान झाले. ते इंग्लंड मध्येही गेले. तेथील लोकांनी त्यांना पार्लमेंटचे सभासद निवडले.

हिंदी लोकांच्या गरीबीची त्यांना फार कीव येई. ते म्हणत, ‘‘परदेशी माल घेऊन परदेशात पैसा पाठविण्यापेक्षा होईल तितका स्वदेशी माल वापरावा. हा पैसा आपल्या देशातील गरीब मजुरांना मिळतो. स्वतःच्या गरजा स्वतः पुरविण्याचा आनंद मिळून जीवन सुखी करता येते.

दादाभाईनी स्वराज्याच्या मागणीची चळवळ फार जोराने सुरू केली. त्यांनी पेरलेल्या त्या बीजाचे मधुर फळ आज आपण चाखीत आहोत. दादाभाईची आठवण हिंदी लोक कधीच विसरणार नाहीत.

☆ ☆

# लोकमान्य टिळक



१९०८ साल होते. मंडालेच्या तुरुंगाचे दार उघडले. लो. टिळक आत गेले. एक कैदी त्यांना स्वयंपाकी म्हणून मिळाला. तो टिळकांच्याकरिता भक्तीने स्वयंपाक करी.

एके दिवशी ११ वाजले. टिळक गीतेवर पुस्तक लिहीत होते. ते बाजूस ठेवून टिळक खाली आले आणि पाटावर बसले. त्यानी पाहिले की भाताची दोन भांडी आहेत. तेव्हा ते म्हणाले, "काय रे

हे दोन भात कसले? एकाच भांड्यात दोघांचा भात होत नाही का?"

"महाराज, हा भात आपल्याकरिता. तो आहे आंबेमोहोर तांदुळाचा; दुसरा भात किडलेल्या तांदुळाचा आहे तो सरकारने माझ्याकरीता ठेवला आहे."

"अरे, उद्यापासून माझ्याकरिता दिलेल्या तांदुळाचा भात आपल्या दोघांना कर. मला दूध मिळते. मला थोडा कमी भात चालेल."

अशा रीतीने आपल्या तांदुळातला हिस्सा टिळकांनी कैद्याला दिला. देशबांधवांची सेवा करण्याची ही वृत्ती टिळकांनी आपल्या समाजाला शिकविली.

ब्रिटिशांपासून हिंदुस्थान स्वतंत्र केला पाहिजे, हे सांगण्यासाठी त्यांनी देशभर हिंडून व्याख्याने दिली आणि केसरी व मराठा ही वृत्तपत्रे चालविली. त्यांचे सरकारविरुद्ध येणारे लेख लोक आवडीने वाचीत; पण गोरे अधिकारी रागावत. लो. टिळक सांगत की, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणार असा प्रत्येक हिंदवासियाने निश्चय करावा. त्यांचे विचार लोकांना पटू लागले. लो. टिळक हे काँग्रेसचे पुढारी झाले, त्यांनी चार गोष्टी राष्ट्रास सांगितल्या. स्वदेशी वस्तु वापरा. परकीय मालावर बहिष्कार घाला. राष्ट्रीय शाळांत मुलांना शिकवा आणि स्वराज्य मिळविण्यासाठी वाटेल तो स्वार्थत्याग करा.

या शिकवणीचा राग येऊन त्यांच्यावर सरकारने खटला भरला. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली. त्यांना हद्दपार करून ब्रह्मदेशात मंडाले येथे तुरुंगात ठेवले. तेथून १९१४ मध्ये सुटल्यावर ते पुण्यास परत आले. तुरुंगातील कष्टांना न भिता त्यांनी आपले काम पुढे चालू केले.

अशाच एका कामासाठी ते मुंबईस गेले असता तेथे आजारी पडले आणि दुर्दैवाने, एक ऑगस्ट १९२० ला मरण पावले. दरवर्षी एक ऑगस्ट या दिवशी त्यांच्या स्मरणार्थ देशभर लोक सभा भरवितात.

☆ ☆

# पं. मदन मोहन मालवीय



बनारस अथवा काशी येथे विद्यापीठ स्थापणारे महापुरुष म्हणजे पंडित मदन मोहन मालवीय होत. त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यापासून त्यांच्या मनात येई की, गंगेच्या काठी विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे कॉलेज, त्यांना राहण्यासाठी आश्रम, ग्रंथालय, प्रयोगशाळा इत्यादी व्यवस्था झाली पाहिजे. त्यांनी आपली कल्पना लोकांना पटवून दिली. सरकारने प्रथम थोडा विरोध केला, पण शेवटी बनारस हिंदू विद्यापीठ स्थापण्यास मंजुरी दिली. राजेरजवाडे, श्रीमंत, गरीब या सर्वांशी गोड बोलून पं. मालवीयांनी दोन कोट रुपये जमविले. आज या विद्यापीठात सगळ्या प्रकारचे शिक्षण देण्याची व्यवस्था असून हिंदुस्थानातून अनेक ठिकाणाहून शेकडो विद्यार्थी शिकण्यासाठी दरवर्षी येथे येतात.

घरची गरिबी असल्याने मालवीयांनी बी. ए. होताच दरमहा पन्नास रुपये पगारावर शाळेत नोकरी धरली होती. पण ती लवकरच सोडून ते 'हिंदुस्थान' या दैनिक पत्राचे संपादक झाले. या पत्राचे मालक होते राजा रामपालसिंह. ते खूप श्रीमंत, विलासी आणि दारूबाज

होते. मालवीयजी गरीब, साध्या राहणीचे आणि मद्यमांसाला न शिवणारे होते. नोकरी धरताना त्यांनी रामपालसिंहाना अट घातली होती की, "रामपालसिंहजी, तुम्ही दारूच्या नशेत असाल तेव्हा माझ्याशी बोलावयाचे नाही." रामपालांनी हा नियम पुष्कळ दिवस पाळला पण अडीच वर्षांनी त्यांनी एकदा तो मोडला. त्याबरोबर मालवीयजींनी ती नोकरी सोडून दिली.

नंतर ते एल्. एल. बी. झाले आणि त्यांनी प्रयागलाच वकिली सुरू केली. वकिलीचा त्यांनी देशबांधवांच्यासाठी उपयोग केला. अडीअडचणी दूर करण्यास त्यांनी स्वयंसेवकदले काढली. ते काँग्रेसमध्ये शिरले आणि लोककार्य करू लागले.

वयाच्या पंचाऐंशीव्या वर्षी ते स्वर्गलोकी गेले. पंचावन्न वर्षे त्यांनी हिंदुस्थानची सेवा केली. अस्पृश्यता दूर करण्याचा संदेश त्यांनी हिंदूंना दिला. हिंदुमहासभेची स्थापना करण्यात ते प्रमुख होते. हिंदी साहित्य संमेलनाचे ते दोनदा अध्यक्ष होते. काँग्रेसचे ते तीनदा अध्यक्ष निवडले गेले.


महात्मा गांधींना मालवीयांबद्दल फार आदर वाटे. ते म्हणत, "मी मालवीयांचा भक्त आहे. तारुण्यात त्यांनी सुरू केलेला देशसेवेचा प्रवाह आजपर्यन्त अखंड चालत आला आहे. ते आचाराने जितके कडक तितकेच मनाने उदार आहेत. ते कुणाचाही द्वेष करू शकत नाहीत. शत्रूचेही ते वाईट चिंतीत नाहीत."

☆ ☆

# महात्मा गांधीजी

हिंदुस्थानात गांधीजींनी पहिली मोठी चळवळ केली ती बिहारच्या चंपारण्यात. तेथील चहाचे मळेवाले 'गोरे' होते. त्यांना सरकारची मदत असे. त्या जोरावर ते शेतकऱ्यांचा छळ करीत. त्याविरुद्ध सत्याग्रह करण्यात आला. त्यात लाठीमार झाला. एका तरुण शेतकऱ्याचे डोके फोडले गेले व त्यातच शेवटी तो मरण पावला! त्याची म्हातारी

आई रडत रडत गांधीजींकडे आली आणि म्हणाली, "मला तेवढाच मुलगा होता! द्या त्याला जिवंत करून." महात्माजीही गहिवरून म्हणाले, "आई, माझी कोठे आहे शक्ती त्याला जिवंत करण्याची? मी तुम्हांस दुसरा मुलगा देतो." आपले डोके त्या म्हातारीच्या पायांवर ठेवून गांधीजी म्हणाले, "या लढ्यात गांधी मेला, तुझा मुलगा जिवंत आहे. तोच तुला नमस्कार करतो आहे. तो तुला अंतर देणार नाही." त्या मातेला अश्रू आवरेनात इतकी ती रडली. तिने हाक मारली, "बापू! ऊठ, तुला शंभर वर्षे आयुष्य आहे."



जो संकटात सापडला तो आपला, असे गांधीजीना वाटे. मग तो शेतकरी असो, श्रीमंत असो की महारोगी असो, याच चंपारण्यातील गोष्ट. महात्माजींच्या बरोबर एक महारोगी सत्याग्रही होता. संध्याकाळ झाली आणि सत्याग्रही शिबिरात परतू लागले. सगळे लोक पोहोचले आणि रात्री प्रार्थना सुरू झाली. बापूजीनी चोहोंकडे पाहिले तो त्यांना तो महारोगी दिसला नाही. चौकशी करता कळले की, चालता न आल्याने तो वाटेतच थांबला आहे.

महात्मा गांधी तसेच तडक उठले आणि निघाले. बाहेर चोहीकडे अंधार होता. पण बापूजींनी हातातील दिव्याने महारोगी शोधून काढला, गांधीजी म्हणाले, "अरे चालता येत नव्हते तर मला का नाही सांगितलेस?" नंतर त्याच्या रक्ताळलेल्या पायाला त्यांनी फडकी बांधली. हळूहळू त्यास त्यांनी छावणीत आणले. त्याचे पाय स्वच्छ धुतले. त्याला जवळ बसविले आणि मगच प्रार्थना सुरू झाली.

तुकारामांनी साधूचे वर्णन केले आहे की,

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥

तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥

खरोखर आयुष्यभर गांधीजींनी हे साधूचे व्रत पाळले. या मानवतेच्या जोरावर ते लढले व आपल्या देशाला त्यांनी स्वातंत्र्य मिळवून दिले.

☆ ☆

# नेताजी सुभाषचंद्र बोस

१९४० सालातील गोष्ट! त्यावेळी आपल्या देशात इंग्रजांचे राज्य होते. सुभाषचंद्र बोस हे बंगाल प्रांतातील थोर पुढारी होते. त्यावेळी बंगाल सरकारने एक हुकूम काढून त्यांना स्वतःच्या घरातच कैद केले होते.

सरकारने त्यांच्या घरा भोवताली पोलिसांचा पहारा बसविला. त्यांच्या वाड्यात कोणासही राहू दिले नाही! सरकारी तुरुंगात कैद्यांशी तरी बोलण्याची संधी मिळते! पण येथे अगदी एकान्तवास! ही कडक शिक्षा होती! रोज सकाळी एकदा जेवणाचे ताट त्यांच्याकडे पाठविले जाई. दुसरे दिवशी ताट देण्यात येई आणि पहिले ताट तोच गडी घेऊन जाई. ही स्थिती पाहिल्यावर सुभाषचंद्रांनी स्वतः ईश्वरध्यान करण्याचे ठरविले व घरातील एका खोलीत पडदा लावून तेथे ते ध्यानस्थ बसू लागले. जेवण आणणाऱ्या गड्यानेसुद्धा पडद्याअलीकडेच अन्न ठेवून चालते व्हावे, अशी त्यांनी आज्ञा दिली.

अनेक दिवस हा क्रम चालला. परंतु एक दिवस नेहमीप्रमाणे ताट

ठेवण्यास गडी गेला तो त्यास आदल्या दिवशीचे ताट न खाताच ठेवलेले आढळले, त्याला वाटले, 'सुभाष आजारी असतील, दोन दिवस असेच गेले! मग मात्र त्याने सरकारला व सुभाषांचे बंधू शरदबाबू यांना ही गोष्ट कळविली. शरदबाबूंना वाटले 'सुभाष फार आजारी असावेत.'' म्हणून त्यांनी त्यांच्या भेटीची परवानगी सरकारकडे मागितली. ते आणि सरकारी अधिकारी घरात पाहातात तो त्यांना धक्काच बसला. सुभाष तेथे नाहीत. ते कैदेतून निसटून गेले होते. पोलिस धावपळ करू लागले. तारातारी सुरू झाली. पण सुभाष त्यांना सापडले नाहीत.



कोठे गेले होते सुभाष? आपल्या देशाला स्वतंत्र करण्यासाठी त्यांनी आपला आवडता देश सोडला. त्यावेळी इंग्रज-जर्मनांचे युद्ध चालू होते. त्यांनी हिंदुस्तान स्वतंत्र करण्यासाठी जर्मनी रशियाचे साहाय्य तेथे जाऊन मागितले. वाटेत लपून छपून त्यांना प्रवास करावा लागला. १९४२ मध्ये ते जपानला गेले व काही दिवसांनी त्यांनी सिंगापूर येथे 'आझाद हिंद सरकार' स्थापन केले. आसामच्या सीमेवर आझाद हिंद सेनेने

इंग्रजांशी चांगला सामना दिला. स्वातंत्र्यासाठी त्यांनी सशस्त्र युद्ध सुरू केले पण पुढे जपान-जर्मनीचा पराभव झाला. आझाद सरकारलाही हादरा बसला. विमानाने जात असता अपघात होऊन सुभाषांचा अंत झाला, असे म्हणतात.

देशगौरव सुभाष हे आय. सी. एस. झाले, पण सरकारी नोकर झाले नाहीत. संसार व संपत्ती यावर लाथ मारून ते काँग्रेसमध्ये शिरले. काँग्रेसचे अध्यक्ष आणि पुरोगामी पक्षाचे संस्थापक म्हणून ते सर्व देशभर हिंडले होते. त्यांच्या या पराक्रमाने दिपून इंग्रजांनी त्यांना कैक वेळा तुरुंगात टाकले, पण त्यातून ते सुटले आणि नंतर सर्व देशही इंग्रजांपासून सोडविण्याचे कामी देशाबाहेर राहून प्रयत्न केले. 'चले जाव' च्या चळवळीस त्यांच्या चळवळीची मदत झाली आणि आपला हा भारत देश दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्यांनी आझाद हिंद फौजेला आणि भारतीय जनतेला 'जयहिंद' ही घोषणा दिली.

☆ ☆

# सरदार वल्लभभाई पटेल

**भर** दुपारची वेळ होती. उन्ह रणरणत होते. एक गोरा अधिकारी घोड्यावर दौडत चालला होता तो एका गावापाशी थांबला. झाडाखाली गावकरी मंडळी बसली होती. त्यात एक उमदा तरुणही होता. त्या गोऱ्या अधिकाऱ्याने उर्मटपणाने आणि अधिकाराने पाणी प्यायला मागितले. त्या गावकऱ्यांपैकी कोणीच आपल्या जागेवरून हलले नाही. अधिकारी संतापला पण मनात चपापला. जरा नम्र झाला. "कृपया पाणी देता का! फार तहान लागली आहे" गोऱ्या अधिकाऱ्याने विनंती केली. मग तेथून तो उमदा तरुण उठला. त्याने त्या साहेबाला पाणी दिले व बजावले एक माणूस म्हणून आपणास पाणी दिले आहे. अधिकारी म्हणून नव्हे." तो अधिकारी मनात उमजला व पाणी पिऊन पुढे निघून गेला.



हा उमदा गृहस्थ म्हणजेच सरदार वल्लभभाई पटेल. त्यांचा जन्म १८७५ साली झाला. लहानपणापासून ते धीट, धाडसी व करारी होते. गुजरात मधील बारडोली येथे इंग्रजांनी सारा वसुलीस सुरुवात केली. दुष्काळाचे दिवस. हातात पैसा नाही. त्यात इंग्रज सरकारने वीस टक्के सारा वाढविला. सारे लोक हवालदील झाले. इंग्रजांच्या अधिकाऱ्यांनी तर जुलमाने सारा वसूल करायचा धडाका लावला. या अन्यायाविरुद्ध पटेल पुढे सरसावले. लोक त्यात सामील झाले. सरकार टरकले. वल्लभभाईना या सत्याग्रहात विजय मिळाला. तेव्हापासून लोक त्यांना 'सरदार' म्हणू लागले. गांधीजींनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक लढे सत्याग्रह उभे केले. सरदार पटेल त्यात अग्रभागी होते. १९४७ साली आपला देश स्वतंत्र झाला. सरदार पटेल हे भारताचे गृहमंत्री झाले. त्यांच्यावर आणखीही एक मोठी जबाबदारी येऊन पडली व ती म्हणजे संस्थानांच्या विलीनीकरणाची. आपल्या देशात त्या वेळेस अनेक लहानमोठी संस्थाने होती. त्या संस्थानिकांची मने वळवून पटेलांनी त्यांना भारतीय संघराज्यात विलीन करून घेतले. पण हैद्राबाद (भागानगर) येथील निजामाने भारतात

विलीन होण्याऐवजी स्वतंत्र राज्य ठेवण्याचे ठरविले. तेथील प्रजेस त्रास होऊ लागला. पण सरदार पटेलांनी खंबीर धोरण ठेवून हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करून घेतले व तेथील लोकांना स्वातंत्र्याचा लाभ मिळवून दिला.

वृत्तीने धाडसी, खंबीर आणि राजकारणपटू असे सरदार वल्लभभाई होते. भीती हा शब्दच त्यांना माहिती नव्हता. त्यांचा हा गुण राजकारणातही त्यांच्या उपयोगी पडला. आपल्या खंबीर धोरणाने त्यांनी देशात स्थैर्य निर्माण केले. त्यांच्या कणखरपणामुळेच लोक त्यांना 'पोलादी पुरुष' असे म्हणत.

☆ ☆

# डॉ. राजेंद्रप्रसाद

१९३४ सालातील एक दिवस. बिहारमधील पाटणा हे शहर एके दिवशी गद्‌गदा हलू लागले. खिडक्या दारे खडखडू लागली. घरे, बंगले, इमारती थरथरू लागल्या. जिकडेतिकडे पळापळ सुरु झाली. जो तो आपला जीव बचावण्याच्या खटापटीस लागला. एका दवाखान्यात एक कैदी आपल्या खाटेवर पडून होता. तोही खाट सोडून खालच्या पटांगणात आला.

समोरच्या आणि आजूबाजूच्या इमारती धडाधड कोसळत होत्या. सगळीकडे आरडाओरड सुरू होती. भूकंप! भूकंप! धावा धावा!" पण या धावणाऱ्या लोकांना धीर देण्यासाठी तो कैदी पुढे सरसावला. खरे म्हणजे तो राजकीय कैदी होता. तो राजकीय कैदी म्हणजेच आपले थोर नेते डॉ. राजेंद्र प्रसाद होय. डॉ. राजेन्द्रप्रसादांना पाहून लोकांना धीर आला. बाबू राजेन्द्र प्रसाद यांनी धीर गंभीरपणाने लोकांना मदत करण्यास सुरवात केली. स्वत:चे सारे विसरून ते कामाला लागले. गांधीजी, पंडितजी आणि इतर अनेक पक्षांचे नेते हेही मदतीसाठी पुढे सरसावले. देशाच्या कानाकोपऱ्यांतून बिहारकडे मदतीचा ओघ सुरू झाला. देशाच्या एकतेची जाणीव साऱ्यांनाच झाली. डॉ. राजेंद्रप्रसाद

ह्यांनी बिहारचे विस्कटलेले जीवन सावरले. मदतीचा हिशेब चोख ठेवला. जनतेचा पैसा कसा सांभाळावा हे उदाहरणानेच दाखवून दिले.



बाबू राजेंद्रप्रसाद हे खऱ्या अर्थाने लोकसेवक व देशसेवक होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ते सदैव आघाडीवरच राहिले. गांधीजी, सरदार पटेल, पंडित नेहरू ह्यांच्या बरोबरीने ते राजकीय लढ्यात काम करीत राहिले.

इ.स. १९४७ मध्ये आपला देश स्वतंत्र झाला. आपल्या कर्तुत्वाने आणि बुद्धीने भारतास परिचित असलेले डॉ. राजेन्द्रप्रसाद हे भारताचे पहिले राष्ट्रपती झाले. राष्ट्रपतीपदास आवश्यक अशी बुद्धी, अभ्यासू वृत्ती, विचारांची सखोलता आणि प्रखर देशभक्ती हे सारे गुण त्यांच्यात एकवटले होते. भारतीयांनी त्यांच्या थोर देशभक्तीचा, बहुमोल त्यागाचा आणि सचोटीचा गौरव केला. बाबू राजेंद्रप्रसाद दोन वेळा स्वतंत्र भारताचे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपतीच्या स्थानास शोभेल अशी गुणवत्ता अंगी असलेला हा थोर देशभक्त भारताच्या इतिहासात अमर झाला आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू



एकदा नागपूर येथे पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंचा मोठा सत्कार झाला. बागेत पंतप्रधानांना थाटाची मेजवानी दिली गेली. छानदार हिरवळीवर टेबल खुर्च्या मांडलेल्या होत्या. मोठमोठे लोक मेजवानीला आले होते. नागपूरची संत्री फारच प्रसिद्ध. तेथे संत्री मुबलक. टेबलवर निवडक टपोरी संत्री मांडलेली होती. खाना सुरू झाला. लोकांनी संत्री खाल्ली आणि त्यांच्या साली सोलून त्या हिरवळीवर फेकून दिल्या. गप्पा चालू होत्या. मेजवानीतील पदार्थांची चव घेण्यात सारे लोक गुंग झाले होते. खात होते, बोलत होते.

तेवढ्यात जवाहरलाल नेहरू ताडकन् उठले आणि हिरवळीवर पडलेल्या संत्र्यांच्या साली ते स्वत: खाली वाकून गोळा करू लागले. त्या साली त्यांनी उचलल्या आणि कचऱ्याच्या पेटीत नेऊन टाकल्या. लोकांनी तो प्रकार पाहिला आणि सारेजण पटापट उठले. संत्र्याच्या त्या साली गोळा करू लागले. पंडितजी हसत हसत त्यांना म्हणाले, ‘‘वाहवा! आता मात्र सारेजण शिस्तीत कामाला लागले हं!’’

पं. जवाहरलाल नेहरूंच्या विद्यार्थी दशेतील गोष्ट. शिक्षणासाठी ते

इंग्लंडमध्ये गेले होते. तेथून सहलीसाठी एकदा ते युरोपात गेले. डोंगरदऱ्यांचा निसर्गरम्य प्रदेश, नॉर्वे देश. तेथील आकाशाच्या विविध रंगाच्या छटांची शोभा पाहण्यात एक प्रकारची आगळीच मौज असते. त्या प्रदेशात सहल करण्यासाठी जवाहरलाल १९१० साली गेले होते. कॉलेजच्या अभ्यासातून सुटी मिळताच फावल्या वेळी निरनिराळ्या प्रदेशात सहल करण्याचा त्यांचा छंद होता. बरोबर एक इंग्रज मित्र घेऊन ते नॉर्वे देशात गेले होते.

डोंगरावरील चढउतार करून एके दिवशी ते थकले. आता स्नान केल्याशिवाय उत्साह येणार नाही, असे वाटल्यावर ते तेथील एका ओढ्यावर थांबले. ओढा खळाखळा वहात होता. पाणी निर्मळ आणि निळेभोर दिसत होते. ओढा तसा फारसा खोल नव्हता, पण पाण्याला ओढ फारच जोराची होती. जवाहरलाल पाण्यात उतरले त्यांनी पोहायला सुरुवात केली. तेवढ्यात ते वाहात चालले. खाली पायही टेकेनात. पाय टेकायला जायचे तर पुन: आडवे व्हायचे. प्रवाहाबरोबर ते खाली खाली चालले. आता काय करावे? ते ओरडू लागले. गारठणक पाण्यामुळे त्यांचे हातपायही गारठून गेले. ते बधीर झाले. तो प्रकार पाहून त्यांचा इंग्रज मित्र धावला. ओढ्याच्या काठाकाठाने चालत त्याने मोठ्या शिताफीने जवाहरलालची तंगडी पकडली आणि जोराने ओढून त्यांना ओढ्याबाहेर काढले.

इंग्रज मित्र म्हणाला. "देवाची कृपा झाली ही. तू जर असाच वाहात आणखी खाली गेला असतास तर तो बघ थोड्या अंतरावरच प्रचंड धबधबा आहे. या कड्यावरून तू खाली खोल दरीत पडला असतास आणि मग काही धडगत नव्हती. पहा काळ आला होता, पण वेळ आली नव्हती."

पं. जवाहरलाल नेहरूंच्या जीवनातील आणखी एक प्रसंग मसूरीच्या मुक्कामात हिमालयातील दऱ्याखोऱ्यातून हिंडणे, बंदूक घेऊन शिकारीला जाणे, बहिणीशी खेळणे, हिंदुस्थानातील त्यावेळेच्या राजकारणाचा अभ्यास करणे आणि चिंतन करणे असा जवाहरचा कार्यक्रम चालत असे. त्यावेळेचा असाच एक आठवणीचा प्रसंग आहे. मसूरीच्या जंगलात जवाहरलाल शिकारीला गेले होते. आता त्यांना नेमबाजी अचूक साधली

होती. इकडे तिकडे फिरत असता त्यांना दूरवर एक सावज दिसले. त्यांनी बंदुकीचा नेम धरला आणि गोळी सोडली.

सावज निसटून गेले, पण त्यांची ती गोळी एका हरीण पाडसाला लागली. तो कोमल, मुका, चिमुकला जीव! धाडकन ते पाडस खाली पडले. तडफड करू लागले. जवाहरलाल धावतच त्या पाडसाजवळ गेले. खाली बसले. डबडबलेल्या डोळ्यांनी ते पाडस जवाहरलालकडे पाहात होते. त्याच्या त्या यातना, त्याचे ते दीन वाणे पाहाणे जवाहालालजींना पाहवेना. त्यांचे मन कळवळले. त्यांचे डोळे भरून आले. डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या.


जवाहरलाल गहिवरले. दाटलेल्या कंठाने ते स्वत:शीच म्हणाले, "हे काय केले मी? छे! छे! आता यापुढे मी हातात बंदूक घेणार नाही! मी शिकार करणार नाही! दुसऱ्यांचे जीव वाचवण्याचेच कार्य यापुढे मी करणार!" त्यांच्या अंगावर शहारे आले. ते खिन्नपणे घरी परत आले.

पं. जवाहरलाल यांचे वडिल पं. मोतीलाल नेहरू हे एक नाणावलेले वकील होते. पण जवाहरलालजींनी वकीली न करता देशाच्या राजकारणात उडी घेतली. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून जवाहरलालजींनी अनेक चळवळीत भाग घेतला. अनेक वेळा ते तुरुंगात गेले. त्यांच्या आयुष्यातील कितीतरी वर्षे तुरुंगात गेली. अखेर दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर ते भारताचे पहिले पंतप्रधान झाले.

पं. जवाहरलाल नेहरूंच्या काळात भारताची झपाट्याने प्रगती झाली. भारतात अनेक करखाने निघाले. धरणे बांधण्यात आली. लोकांच्या उन्नतीसाठी अनेक विकासयोजना आखण्यात आल्या, जगातील सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीचा दर्जा भारताला मिळावा म्हणून ते अतिशय कष्ट घेत.

पं. जवाहरलालजींना मुलाफुलांची अतिशय आवड होती. ते जात तेथे प्रथम मुलांची भेट घेत. मुलांच्या मेळाव्यात रमत. देशोदेशींच्या मुलांसाठी पं. नेहरूंनी भारताच्या अनेक वस्तू भेट पाठविल्या आहेत. दि. १४ नोव्हेंबर हा पं. नेहरूंचा जन्मदिवस साऱ्या जगभर बालदिन म्हणून पाळण्यात येतो.

# लालबहादूर शास्त्री



इ.स. १९६५ मधील ऑगस्ट महिना होता. भारताच्या काश्मीर व पंजाब सरहद्दीवर पाकिस्तानी सैन्य मोठ्या प्रमाणात जमले होते. काश्मीरमध्ये काही हेर घुसले होते, त्यांनी तेथे घातपाती कारवाया करावयास सुरुवात केली. आणि अचानक पाकिस्तानी फौजा भारतीय सरहद्दीवर गोळीबार करू लागल्या. रणगाडे घुसू लागले. पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींशी आपल्या सेनेच्या अधिकाऱ्यांनी संपर्क साधला. संकटाची कल्पना दिली. शास्त्रीजींनी मुळीच वेळ न घालविता तडफदारपणे सांगितले "सर्व शक्तीनीशी शत्रूला खडे चारा." आणि मग भारतीय विमानांनी क्षणात आकाशात झेपा घेतल्या. तोफा धडधडू लागल्या शत्रूची पळता पुरेवाट झाली. देशाच्या या लाडक्या नेत्यामागे सारी जनता खडी राहिली. भारतास या युद्धात विजय मिळाला.

अशा या भारताच्या सुपुत्राचा जन्म मोगलसराई या गावी झाला. दिनांक २ ऑक्टोबर १९०४ हा दिवस होता तो.

शास्त्रीजीचे वडील ते दोन वर्षांचे असतानाच वारले. शास्त्रीजी आजोबांच्या

घरी वाढू लागले. शांत, गोड आणि मनमिळाऊ स्वभावाचा हा छोटा मुलगा नन्हे सर्वांचा आवडत बनला.

एकदा दुपारची वेळ होती. काही मुले एका बागेत गेली, ती झाडावर चढली, झाडावरील फळे काही स्वतः खायची, काही मित्रांसाठी खाली फेकायची, असा त्यांचा खेळ सुरू झाला. आरडाओरड, गडबड, दंगामस्ती यांना ऊत आला.

बागेचा माळी यावेळी झोपला होता. पण तो मुलांच्या गोंगाटाने जागा झाला. तो ताडकन उठला, त्याने हातात काठी घेतली आणि धावत तो त्या मुलांकडे आला. मग काय? पटापटा उड्या पडल्या. झाडावरील माकडे भराभर खाली उतरली. सारीकडे पळापळ झाली. हा हा म्हणता ती सारी मुले धूम पळून गेली. म्हातारा माळी इकडे तिकडे धावत सुटला. शेवटी त्याने एका लहान मुलाला पकडले. अवघ्या सहा वर्षे वयाचा तो मुलगा होता, ठेंगणा बांधा, हसरा चेहरा, पण माळ्याने त्याची मान पकडली तेव्हां तो एकदम रडू लागला, काकुळतीला येऊन तो म्हणाला, "माळीदादा, मला मारू नका हो! मी झाडाचे एकही फळ तोडले नाही! हा मी इथच उभा होतो!"

माळी एकमद खेकसून म्हणाला, "कोणाचा आहेत तू? नाव काय तुझ बोल?" तो मुलगा म्हणाला, "मी ऽ नन्हे! माझी आई मला नन्हे म्हणते मी गरीब आहे! मला वडील नाहीत हो!"

"तर मग चांगलं वागण्याची जबाबदारी तुझ्यावरच आहे की! जा यापुढं तुझा तूच चांगल वागायला शीक!" असे म्हणून म्हाताऱ्या माळ्याने नन्हेला सोडून दिले. माळ्याचे ते वाक्य घोकीत घोकीत नन्हे शांतपणाने घरी आला. यापुढे चांगलं वागण्याची त्याने शपथ घेतली. त्या माळ्याला पहिला गुरू समजून त्याच्या उपदेशाप्रमाणे वागणारा हा नन्हे म्हणजेच लालबहादूर!

वयाच्या दहाव्या वर्षी ते काशी येथे शिक्षणासाठी गेले. खूप वाचन करावे, खेळावे, पोहावे, स्वाभिमानाने राहावे अशा रितीने जीवनक्रम सुरू झाला. विद्यार्थीदशेत असताना सारे जीवन पूर्ण साधे व स्वावलंबी होते. स्वभाव धाडसी होता. एकदा नदी पलीकडे जायचे होते पण

नावेतून जायला पैसे नव्हते. या धाडसी तरुणाने सरळ गंगेत उडी झोकली आणि पोहत गंगा पार केली.

देशभर स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. सभा, मिरवणुका, सत्याग्रह यांचा धुमधडाका सुरू झाला. गांधीजींच्या भाषणाने प्रभावित झालेल्या लालबहाद्दूर शास्त्रींनी शिक्षण सोडून दिले. खादी वापरण्यास सुरुवात केली. स्वातंत्र्यासाठी अनेकदा तुरुंगात जावे लागे. बाहेर असले की लोकजागृतीचे काम चाले. 'स्वातंत्र्य' या शब्दाखेरीज मनात दुसरा विचारच नव्हता. देशसेवा चालू होती पण त्यांनी शिक्षणही अर्धवट न सोडता पूर्ण केले काशी विद्यापीठात शिकून त्यांनी 'शास्त्री' ही पदवी मिळविली.

इ.स. १९४७ मध्ये आपला भारत देश स्वतंत्र झाला. शास्त्रीजी प्रथम उत्तर प्रदेशात मंत्री झाले. त्यागी, कष्टाळू आणि प्रामाणिक असे हे गृहस्थ सर्वांच्या नजरेत भरले. पंडितजीनी त्यांना दिल्लीस बोलावले. त्यांच्याकडे जबाबदारीची कामे सोपविली प्रथम ते रेल्वेमंत्री होते नंतर गृहमंत्री झाले. पंडित नेहरूंच्या निधनानंतर त्यांनी देशाच्या पंतप्रधानकीची जबाबदारी स्वीकारली. हातात मोठा अधिकार, भरपूर पैसा, सेवकवर्ग, आणि सर्व सुखसोयी आल्या पण शास्त्रीजींची रहाणी बदलली नाही. साधी राहणी, नम्र स्वभाव आणि शांतवृत्ती व या बरोबर प्रखर देशभक्ती यात मुळीच बदल झाला नाही.

देशावरील संकटाच्या काळांत शास्त्रीजींनी खंबीर वृत्तीने राजकारण केले. सर्वांची मने सांभाळली. एका थोर देशाचे थोर नेते असा लौकिक मिळवला. शेतकरी आणि सैनिक यांचे देशाच्या दृष्टीने असलेले महत्व लक्षात घेतले. ११ जानेवारी १९६६ रोजी ते ताश्कंद येथे अचानक निधन पावले. छोटी मूर्ती अदृश्य झाली, पण मोठी कीर्ती मागे राहिली.

☆ ☆

2802